म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय

दा. क. [illegible] १८६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

संग्रहालय क्रमांक १६१ / २४९

लेखक केशव वामन पेठे

सन १८९८

पुस्तकाचें नांव रामानंद योगी [illegible] स्वामींचे चरित्र

१६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– र  ि ल्या  पुस्तक परत करावे,

रसिकवर

# वामन दाजी ओक

यांचें

## पुष्पभाषात्मक चरित्र.

---

लेखक

## केशव वामन पेठे.

---

आच्छादनमीमांसा—वस्त्राच्छादन,
विश्वचमत्कार, आचारमीमांसा, उद्योग नशीबाचा कारागीर,
राष्ट्रभाषा, नीतिधैर्य, गोपरीक्षा, इत्यादि
लोकप्रिय पुस्तकांचे कर्ते
यांणीं लिहिलें

तें

मुंबईत "बॉम्बे न्यू प्रेस" मध्यें छापिलें.

सन १८९८

[ सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेवले आहेत. ]

किंमत ४ आणे.

# प्राक्कथन.

काव्यसंग्रहाकरितां कै. वा. दा. ओक यांचें, अत्यल्प उपलब्ध माहितीच्या आधारानें लघु चरित्र लिहीत असतां, त्यांचें अलंकारिक चरित्र लिहिण्याची स्फूर्ति झाल्यामुळें प्रस्तत चरित्र अस्तित्वांत आलें आहे. माहितीच्या अभावामुळें चरित्रास कमीपणा आलेला भरून काढण्याकरितां प्रस्तुत पद्धतीचें अवलंबन केलें आहे. म्हणून, उपयुक्ततेच्या दृष्टीपेक्षां शोभेच्या दृष्टीनेंच वाचकांनीं हें चरित्र वाचावें, व हा प्रयत्न कसा काय साधला आहे याचें परीक्षण करावें. प्रस्तुत चरित्रास क्वचित् प्रसंगीं गद्य-काव्य ही संज्ञा दिली आहे.काव्यरसात्मक असतें,शृंगारादि सर्व रस यांत नाहींत म्हणून, त्याचें संपूर्ण लक्षण यास लागत नाहीं हें खरें, तथापि ही संज्ञा देण्यांत चुकीच झाली आहे असें नाहीं. वक्तृत्वोत्तेजक सभांतील विषयांवर बोलणारे येथून तेथून सारे वक्तेच, व काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालेल्या सर्व कविता काव्यें, व तीं बनविणार ते कवि, किंवा संध्येच्या पळीभर गंगोदकास गंगा, असें ज्या दृष्टीनें म्हणतां येईल त्याच दृष्टीनें हें गद्यकाव्य ठरेल. तथापि, या चरित्रास 'अलंकारिक भाषात्मक'ही संज्ञा अधिक प्रशस्त आहे. आतां अलंकारिक भाषा या शब्दाहून पुष्पभाषा या शब्दांत सौष्टव अधिक आहे असें आढळेल. कारण, अलंकारांनीं शोभेचाच बोध होतो आणि ते कृत्रिम असतात. पुष्पांनीं शोभेचा व सुगंधाचाहि अर्थ ध्वनित होतो, व तीं निसर्गतः उत्पन्न झालेलीं असतात. म्हणून, कृत्रिम वस्तूच्या दृष्टांतापेक्षां स्वाभाविक वस्तूचा दृष्टांत अधिक उत्कृष्ट नव्हे काय ! अलंकारांपेक्षां पुष्पांची योग्यता मी अधिक मानितों, व आपल्या प्रस्तुत भाषेस त्यांची संज्ञा देतों एवढ्यावरून आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या अलंकारिक वर्णनांहून, माझें हें वर्णन अधिक योग्यतेचें मी मानितों असें समजण्यास कांहीं कारण नाहीं. आपल्या आवडत्या मुलास गौरवयुक्त नांव ठेविल्यानें मातापितरें दोषी होतील काय ? असो. प्रस्तुत चरित्र कोणत्या धोरणांवर लक्ष देऊन लिहिलें आहे, तें मनांत वागवून वाचकांनीं हें वाचावें, अशी प्रार्थना करून हा अल्प प्रस्ताव पुरा करितो.

# कै० ओक यांच्या पुष्पभाषात्मक-चरित्रावर अभिप्राय.

**मासिक मनोरंजनः**--श्रीयुत केशव वामन पेठे यांच्या लेखणींतून उतरलेलें वैकुंठवासी कविवर्य वामनराव ओक यांचें हें द्वितीय चरित्र आहे. चरित्र या दृष्टीनें या पुस्तकाचें जरी फारसें महत्व मानितां येणार नाहीं, तरीहि श्रीयुत पेठे, यांणीं या अत्यल्प चरित्रांत चरित्रनायकाच्या बहुतेक अनुकरणीय गुणांचा परिचय दिला असल्यामुळें, हें बोधप्रद व अनुकरणीय झालें आहे श्रीयुत पेठे यांची भाषाकन्यका नेहमींचीं कंटाळवाणीं कर्में क्षणभर बाजूस ठेवून, वामनरावजींसारख्या महात्म्यांच्या चरित्रलेखनाचा सुदिन साजरा करण्याकरितां, नूतन सुंदर वस्त्रभरणांनीं सुसज्ज होऊन आली असल्याकारणानें, हें चरित्र मोठें चित्तवेधक आणि हृदयंगम झालें आहे. नव नव वस्त्राभरणांनीं नटल्या थटलेल्या या महाराष्ट्रभाषासुंदरीची सहज लीला पाहून, प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति क्षणभर कुतुहलभाराकांत झाल्याविना राहणार नाहींत अशी खात्री आहे. या मनोहर नूतन गद्य-काव्याचा आस्वाद प्रत्येकानें एकवार तरी अवश्य घ्यावा, अशी त्याची योग्यता आहे जरी क्वचित् स्थळीं वाक्यरचना थोडीशी दुर्बोध झाल्यासारखा भास होतो, तरी एकंदरींत, कविताराज्ञीचे सेनानी वामनरावजी, यांची छबी, श्रीयुत पेठे यांच्या या पुष्पभाषात्मक चरित्रांत फारच खुलून राहिली आहे.

---

रा. रा. केशव वामन पेठे कृत, विद्वद्वर्य कवि कै. वा. रा. रा. वामनराजी ओक यांचें, हें पुष्पभाषात्मक संक्षिप्त चरित्र समग्र वाचून पाहिलें. यापासून स्वभाषोत्कर्षाविषयींची उत्कट इच्छा, चरित्रनायकाविषयींची निःसीम पूज्यबुद्धि, स्वजनोन्नतीविषयींची दृढ आस्था वगैरे, सदहू ग्रंथ-

काराच्या ठायीं पूर्णपणें जागरूक आहेत, असें सहृदय वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. मतवैचित्र्याचा प्रकार बाजूला ठेवून, केवळ पांडित्यभागाकडे लक्ष दिल्यास, अशा तऱ्हेच्या गद्यकाव्यात्मक घटनेमुळें, मराठी भाषेस विशेष प्रौढि येणार यांत कांहीं संशय नाहीं. आतां कित्येकांस काठिण्यहि भासल्यास, ती गोष्ट निराळी. ज्याचा जितका अधिकार त्याचा तितका समज. एकंदर विचाराअंतीं, असें कळून येईल कीं, रा. रा. पेठे यांजकडून मराठी भाषेंत अशाप्रकारचीं अलंकारप्रचुर, अभिनव सुंदर चरित्रलेखनपद्धति प्रचारांत आली, हें एक त्यांच्या विद्वत्तेचें व मार्मिकपणाचें द्योतक चिन्हच होय. सारांश, प्रस्तुत कन्यागतांतर्गत सुमुहूर्तावर दृढसंकल्पपूर्वक वाचकवरप्रीत्यर्थ, या सालंकृत वाक्कन्यादानाच्या अपूर्व योगाचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. शेवटीं, रा. पेठे यांच्या सारख्यांचा अशा कामांत असाच क्रम सतत चालू राहिल्यास, मराठी भाषा हळुहळू भरभराटीसच येत जाईल अशी पूर्ण आशा आहे. ती सफळ होईल तोच सुदिन मुंबई वाळकेश्वर २०-६-९८.

आत्माराम मोरेश्वर छत्रे.

बडोदा स्टेट पेन्शनर.

रा. रा. केशव वामन पेठे यांसः—

सा. न. वि. वि. आपण लिहिलेलें, सुप्रसिद्ध महाराष्ट्र ग्रंथकार कै. वामन दाजी ओक यांचें हें चरित्र वाचून पाहिलें. रा. ओकांसारख्या काव्यमर्मज्ञांचे चरित्रापासून नवीन पिढीनें पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे; व तें काम आपले लेखापासून बरेंच सिद्धीस जाईल असें वाटतें. कै. वामनरावजींची विद्वत्ता, उद्योग, स्वकार्यनिष्ठा, विनयशीलता, व महाराष्ट्र कवितेविषयीं अतोनात अभिमान, इत्यादि गुणांचें या चरित्रांत चांगलें प्रतिबिंब उतरलें असल्यामुळें, तें वाचण्यालायक झालें आहे.

आपल्यासारख्या नांवाजलेल्या ग्रंथकारांनीं असलीं मनोरंजक व उपयुक्त चरित्रें लिहिण्याकडेच नेहमीं आपली लेखणी वापरल्यास, महाराष्ट्र ग्रंथ-संग्रहांत पुष्कळ चांगल्या पुस्तकांची भर पडेल यांत शंका नाहीं.

मुंबई. ता २८ जून. सन १८९८. ईसवी. आपला,

**महादेव राजाराम बोडस.**

एम्. ए. एल्. एल्. बी.

हायकोर्ट वकील.

---

रा. रा. केशवरावजी पेठे, हे विद्यादेवीचे उपासक असून, महाराष्ट्र-भाषेची एकनिष्ठपणें सेवा करणाऱ्यांपैकीं एक आहेत. तेव्हां प्रस्तुत चरित्र त्यांचे हातून कसें उतरलें असेल, याची कल्पना वाचकांस आपोआपच होणारी आहे. 'गुणी गुणं वेत्ति' ह्मणजे गुणिजनाचे गुण जाणण्यास गुणवानच पाहिजे, या न्यायानें विद्वद्वर्य कै. वा दा. ओक यांचें चरित्र लिहिण्यास रा. पेठे किंवा त्यांचे सारखाच कोणी पाहिजे होता, व हें काम रा. पेठे यांनीं स्वसंतोषानें हातीं घेऊन, त्यांजकडे हवी तितकी साधनसामग्री नसतांहि, चांगल्या रीतीनें पार पाडिलें असें ह्मटलें पाहिजे. आपल्या चरित्रनायकाचे योग्य त्या गुणांचें वर्णन करून, त्यापासून काय शिकावयाचें तें त्यांनीं ठिकठिकाणीं व्यक्त करून दाखविलें आहे, व तें अगदीं वरवरचे वाचकांसही कळावें ह्मणून, सारभूत अशा पांच गोष्टी अगदीं ठळक रीतीनें सांगितल्या आहेत. तसेंच प्रस्तुत चरित्रामध्यें चरित्र-नायकाविषयींची आपली अत्यन्त पूज्य व उदारबुद्धि. मराठी भाषेच्या उत्कर्षाविषयीं कळकळ, आंग्लभाषेंत प्रावीण्य मिळालें आहे एवढ्याच जोरावर स्वभाषेची अवहेलना करणाऱ्या कित्येक पंडितंमन्यास योग्य इशारा देण्याची हातोटी, व विद्वान् परंतु आळशी अशा कित्येकांस आपल्या विद्वत्तेचें चीज करण्याविषयीं सहज ओघानें सूचना करण्याची शैली, हीं चरित्रकारांनीं उत्तम रीतीनें व्यक्त केलीं आहेत. या ग्रंथाच्या भाषेबद्दल स्वतः ग्रंथकारांनींच खुलासा केला आहे, याकरितां तिकडे

बारीक दृष्टीनें बघण्यास नकोच. आतां आपण हें गद्यात्मककाव्य लिहिलें आहे, असें जें ग्रंथकारांनी एकदोन ठिकाणीं ह्मटलें आहे, त्याचा उद्देश हें काव्य आहे असें आग्रहानें म्हणण्याचा नसून, संस्कृतांत जीं कादम्बरीसारखीं गद्यकाव्यें आहेत, त्यांचे धर्तीवर हें चरित्र लिहिलें आहे इतकेंच सांगण्याचा असावा. कारण, काव्य रसात्मक आहे. अलंकार हे त्यास खुलविणारे आहेत. भाषा अलंकारिक असली ह्मणजे तेवढ्यानें ग्रंथास काव्यत्व येत नाहीं, हें ग्रंथकारासहि माहित आहे. एकंदरींत हा प्रयत्न उत्तम साधला आहे, हें ग्रंथकर्त्यास भूषणावह होय. ता. २१ जून १८९८.

**मोरेश्वर रामचन्द्र काळे. बी. ए.**

संस्कृताध्यापक–विल्सन हायस्कूल, मुंबई.

---

कै. वामनरावजींची प्रसिद्धि मुख्यत्वें करून उत्तम कवि, काव्याचें खरें ह्रद्गत जाणणार, मार्मिक टीकाकार, व लेखनपटु ह्मणून होती. यास्तव, राजकार्यधुरंधर वगैरे पुरुषांच्या चरित्रांत ज्या गोष्टींचा इतिहास देतात, तसा यांत दिला नाहीं ह्मणून या चरित्रास वैगुण्य येत नाहीं तथापि, त्यांच्या काव्यग्रंथांतून निवडक उतारे देऊन, त्यांची काव्यरचनेची शैली कशी होती, व त्यांनीं ज्या काव्यांवर टीपा दिल्या आहेत त्यांतून कांहीं कठिण पद्यें निवडून काढून, त्यांची टीपा देण्याची हातोटी कशी होती, याचें थोडेंसें वर्णन आपण केलें असतें तर बरें झालें असतें चरित्रात्मक लेख लिहिण्यास जी सामुग्री पाहिजे, ती जतन करून ठेवण्याची आपणास सवड नसल्यामुळें, त्यांचीं काव्येंहि आपल्या दृष्टीस पडलीं नाहींत, अशा अडचणीचा विचार केला ह्मणजे उपलब्ध त्रोकट माहितीचा आपल्या अलंकारिक व मनोहर भाषेच्या योगानें भाषण विस्तार करून, आपलें पुस्तक वाचनीय केलें आहे यांत संशय नाहीं.

**महादेव वामन भट.**

बी. ए. एल्. एल् बी.

हायकोर्टवकील.

---

इ. २०८

# वामन दाजी ओक.

कोणी स्वयें मात्र गुणी रहातो । कोणी बरा शिक्षक मात्र होतो
दोन्ही मिळाले गुण हे जयाला । तो होय की सद्गुरु शिक्षकांला ॥१॥

या जगतीतलावरील अखिल प्राणिवर्गांत मानवप्राणी श्रेष्ठ आहे. हा श्रेष्ठपणा त्यास ज्ञानानें प्राप्त झाला आहे. दिवसेंदिवस मानव आपल्या ज्ञानबळानें चमत्कारिक व विस्मयावह कल्पना काढून आपल्या सुखसाधनांत भर घालीत आहे. आगगाड्या, आगबोटी, विमानें, तारायंत्रें, दुर्बिनी, इत्यादि जीं मानवाच्या कल्पनेचीं फळें किंवा त्याच्या सुखाचीं साधनें, त्यांनीं त्याच्या सुखांत किती भर पडली आहे, व नवनव्या युक्तींनीं तो आपलें सुख आणखी किती वाढवील, याची आज अटकळ करवत नाहीं. आतां, हीं ऐहिक सुखें कितीही वाढलीं, तरी तीं नश्वर किंवा अशाश्वत असल्यामुळें, पारमार्थिक, शाश्वत किंवा चिरकालिक सुखांपुढें तुच्छच होत. कारण, या जगांत जोंपर्यंत आपलें अस्तित्व आहे तों पर्यंतच फार तर आपणांस त्यांचा लाभ झाला तर होईल, मृत्युपश्चात् तीं आपणांस असून आणि नसून सारखींच. परंतु, पारमार्थिक सुखांचें तसें नाहीं. तीं सुखें आपणांस सर्वकाळ शांति देणारीं असल्यामुळें, त्यांच्या प्राप्तीचा उद्योग करणें अत्यंत आवश्यक आहे. पारमार्थिक सुख प्राप्त होण्यास तरी ज्ञानच कारण आहे परंतु, हें ज्ञान ऐहिक ज्ञानाहून फार उदात्त आहे. या ज्ञानानें आपणांस आपली स्वतःची ओळख होते. या ज्ञानास आत्मज्ञान असें म्हणतात. वेदांतांत या ज्ञानाचें विवरण केलेलें आहे. तें अत्यंत प्रगल्भ विचारांनीं केलें असल्यामुळें, सामान्य जनास समजणें कठीण असें जाणून, श्रीमद्व्यासवाल्मीकांसारख्या ऋषिश्रेष्ठांनीं, रामायण, भारत, भागवत इत्यादि पुराणग्रंथांत, रामकृष्णादिकांच्या चरित्रवर्णनांच्या प्रसंगवशानें त्याचा ऊहा-

पोह केल्यामुळें, तें संस्कृतभाषाभिज्ञांस फारच उपयुक्त झालें आहे. धार्मिक दृष्टीनें श्रुति किंवा वेद यांहून स्मृति, व स्मृतींहून पुराणग्रंथ कमी प्रतीचे मानले गेले आहेत तरी, विवक्षित प्रसंगीं यांची सारखीच उपयुक्तता निदर्शनास येत आहे. जगांतील आद्यग्रंथ वेद असल्यामुळें धर्म, भाषा, व कल्पना यांची उन्नति कशी होत गेली, यांचा विचार करण्याकरितां आधुनिक पाश्चात्य विद्वानांनीं त्यांचीं पारायणें चालविलीं आहेत. स्मृतिशास्त्रानें आमचे प्राचीन आचार-विचार व व्यवहार कसे होते यांचें ज्ञान होतें. महाभारतासारख्या पुराणग्रंथांत तर सर्व ज्ञानाचा सांठाच आहे. आमचे पूर्वज कसे पराक्रमी होते, आमच्या विद्या व कला किती उन्नतावस्थेस पोंचल्या होत्या, ज्ञानमार्गातून भक्तिमार्गाकडे लोकांची प्रवृत्ति कसकशी होत गेली. खाणें-पिणें, विवाह, सामाजिक चालीरीती इत्यादिकांत कसा फरक पडत चालला, इत्यादि गोष्टींचा विचार त्याच्या वाचनानें कळण्यासारखा असून, जागजागीं अत्यंत सुलभ रीतीनें आत्मज्ञानाचा विचारही त्यांत आढळेल. रामायणभारतादि ग्रंथ जरी अत्यंत उपयुक्त आहेत तरी, त्यांची भाषा संस्कृत असल्यामुळें, ही भाषा न जाणणारांस यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. संस्कृत प्रचारांतून गेल्यास आज सुमारें अडीच हजार वर्षें झालीं. संस्कृतामागून प्राकृत भाषा प्रचारांत आल्या. प्राकृत भाषांपैकीं महाराष्ट्री भाषेचें रूपांतर होऊन, व तींत मागधी वगैरे भाषांतील शब्द मिळून, आपली प्रस्तुतची मराठी भाषा बनली आहे. प्राकृत भाषा प्रचारांतून गेल्यास सुमारें हजार वर्षें झालीं आहेत. नदीच्या प्रवाहांतील धोंडे झिजून, उत्तरोत्तर त्यांचें पूर्वीचें रूप पालटतें तद्वत, व्यवहारांत उपयोगांत असलेल्या शब्दांचें रूप कालांतरानें पालटत चालल्यामुळें, प्राचीन शब्द अपरिचित झाले म्हणून, त्यांस हल्लीं दुर्बोधता आली आहे. भारत-रामायणादि अत्यंत महत्वाच्या ग्रंथांतलें ज्ञान असंस्कृतज्ञांसही व्हावें म्हणून, मुकुंदराज, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास,

वामन, मोरोपंत, इत्यादि साधु यांनीं व कवींनीं लोकांच्या जिवंत भाषेंत त्या ग्रंथांचीं आपल्या प्रासादिक वाणीनें पद्यमय भाषांतरें केलीं, त्यामुळें आह्मां महाराष्ट्रीयांवर त्यांचा मोठाच उपकार झाला ह्मणावयाचा. गद्य-रूपापेक्षां भाषेचें पद्यरूप मनोहर खरें, परंतु जितकें तें मनोहर तितकेंच समजण्यास कठीण असतें. तशांत मराठीचें पद्यरूप, जगांतील अत्यंत भारदस्त व प्रौढ अशा संस्कृत भाषेच्या वळणावर गेल्यामुळें, मोरो-पंतासारख्या कवीचे ग्रंथ फारच कठिण झाले आहेत. या कवीसारख्या कवींच्या काव्यनटीनें जागजागीं सुंदर व मनोहर अलंकार धारण के-ल्यामुळें, त्यांखालीं तिचें स्वाभाविक स्वरूप लोपून गेलें आहे. ज्ञान-देवाच्या ज्ञानेश्वरीसारख्या अप्रसिद्ध शब्दांनीं भाषेस दुर्बोधत्व आलें आहे. ह्मणून, या प्रकारच्या कविता समजण्यास सामान्य जनास फार प्रयास पडतात. आतां महाराष्ट्रभाषेंत अलंकारांचें विवेचन करण्यास अलंकार शास्त्र, व दुर्बोध शब्दाचे अर्थ कळण्यास हंसकोशासारखे ग्रंथ झाले आहेत, वृत्तांच्या जातींचें ज्ञान होण्यास वृत्तदर्पण आहे, शब्दांचा परस्पर संबंध दाखविण्यास व त्यांच्या अर्थाचें विवेचन करण्यास व्या-करण व नैरुक्त ग्रंथ झाले आहेत ह्मणजे, काव्याच्या अंगोपांगांचा विचार करण्यास साधनीभूत असे लहान मोठे ग्रंथ मराठींत आहेत हें खरें, तरी केवळ त्यांच्या साह्यानें काव्याचें मर्म सामान्य वाचकास क-ळणें दुर्लभ आहे. कारण, हे किंवा याच जातीचे मोठाले ग्रंथ काव्यांचें फार तर विशदीकरण करतील परंतु, तेवढ्यानें काव्यार्थ मनांत कसा शिरावा! कारण, या ग्रंथांच्या मागृनीनें केवळ नियम कळतील, परंतु नुस्ते नियम कळल्यानें काव्याचें मर्म समजणें कठिण आहे. त्रैराशिक कर-ण्याचें ज्ञान झालें ह्मणजे, त्रैराशिकानें होणारें कोणतेंही उदाहरण कर-तां येईलच असें नाहीं. त्याचे नियम कसे लावावे हीच मोठी पंचाईत असते. ह्मणून, सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यास तसलीं कित्येक उदाहरणें सोडवून दाखविणारा कोणी भेटल्यास, त्यांत त्याची हळूहळू गति

होत जातें. तद्वत काव्याचा भाव टीपांच्या रूपानें व्यक्त केला असतां तो कळण्यास मग फारशी पंचाईत नसते. यावरून असें दिसून येईल कीं, कोणतीही गोष्ट मनांत चांगली ठसविण्यास चांगल्या गुरूची आवश्यकता असते. सर्वच गुरूंस हें काम साधेल असें नाहीं. कारण दुसऱ्याच्या मनांत एखादी गोष्ट ठसवून देण्यास ती गोष्ट प्रथम शिकविणारास चांगली समजावी लागते. केवळ स्वतःस एखादी गोष्ट चांगली समजली म्हणजे ती दुसऱ्यास चांगल्या रीतीनें समजवितां येईलच असें कांहीं नाहीं. कित्येक गुरु असे असतात कीं, त्यांस शिकवावयाची गोष्ट चांगली समजलेली असते परंतु, दुसऱ्यास ती नीट शिकवितां येत नाहीं. कित्येकांस ती तिलपतच कळलेली असते, परंतु ते शिकविण्याच्या कामांत फार निष्णात असतात. विद्यादेवीच्या राज्यांत या दोन्ही प्रकारच्या गुरूंची साधारणच योग्यता असते परंतु, ज्यास शिकविण्याची गोष्ट उत्तम रीतीनें समजलेली असून, दुसऱ्यास उत्कृष्ट रीतीनें शिकवितां येते तोच खरा गुरु होय. तो केवळ असातसा गुरु नव्हे, तो गुरूंचाही गुरु होण्यास योग्य आहे. सामान्य गुरु गल्लोगल्लीं आढळतात. परंतु असले गुरु क्वचितच असतात. महाराष्ट्र काव्यसंग्रहाचें मर्म लोकांचे मनांत सुलभ रीतीनें भरविण्यास आमचे प्रस्तुतचे चरित्र–नायक फारच योग्य गुरु होते. कारण, यातील काव्यांचे उगम जे भारत भागवतादि ग्रंथ, त्यांचें त्यांनीं आस्थापूर्वक अध्ययन केलें होतें, व काव्यागें कळण्यास जे जे विषय अवश्य लागतात, त्यांचें परिशीलन त्यांनीं चांगलें केलें होतें. शिवाय, ते रसिक कवि असल्यामुळें, कवितेचें हृद्गत चटकन त्यांच्या ध्यानीं येत असे व, तें दुसऱ्यास मार्मिक रीतीनें समजावून देण्याची हातोटी त्यांस फारच चांगली साधली होती, ही गोष्ट त्यांनीं चालविलेल्या काव्यसंग्रहाच्या कोणत्याही पानावरील टीपा पाहिल्या असतां लक्षांत येण्यासारखी आहे. असो, तेव्हां महाराष्ट्र काव्यांच्या अध्यापन कर्मांत ज्यांस गुरूंचेही गुरु म्हणतां येईल, त्या आमच्या चरित्र–नायकाचें अल्प चरित्र येथें सादर करितों.

'रत्नागिरी प्रांतांत ज्यांचें वास्तव्य, व ज्यांच्या संनिध रत्नाकर सागर आहे परंतु, ज्यांस रत्नाचा लाभ तर नाहींच पण मध्यान्ह काळची क्षुधा निवारण्याचीही पंचाईत ह्मणून, जे देशोदेशीं भटकताहेत.' अशा निंदेचें परिमार्जन व्हावें ह्मणूनच कीं काय, विधात्यानें रत्नागिरिस्थास बुद्धीची अतुळ देणगी दिली आहे त्यामुळें, त्यांच्यांत विद्येचें तेज कांहीं विलक्षण रीतीनें चमकत× आहे. रत्नागिरी प्रांतांत हिऱ्यामाणकां सारखीं केवळ दृषद्रत्नेंच महामूर असतीं, व येथले लोक जडमूढ असते तर, फारतर या प्रांताची रत्नासंबंधानें ख्याती झाली असती परंतु, येथल्या लोकांची स्थिति, रत्नें व सोनें यांच्या लालचीस भुलून, गोरकाख्यांनीं अमेरिकन इंदियनांचा पार धुव्वा उडवून दिला, त्याच वळणावर बहुधा गेली असती. विद्वद्रत्नाची योग्यता काचमण्या सारख्या निर्बुद्ध जड रत्नास कधीं तरी येईल काय! ज्या रत्नागिरिस्थांनीं स्वराज्यांत दिल्ली अटके पर्यंत झेंडे लावण्यांत भाल्याचा उपयोग केला, त्या भाल्यानें दयाळू व शांतताप्रिय इंग्रज सरकारच्या राज्यांत लेखणीचें रूप धरिलें आहे. या लेखणीच्या जोरावर महाराष्ट्राज्यांत ते आपलें नांव गाजवीत आहेत. तेव्हां, काव्यसंग्रहाचें मर्म चरित्र नायकानें हृदयभेदक यथायोग्य शब्दांनीं वाचकांच्या मनावर ठसा उठवून, त्यांत चित्रिलें यांत फारसें आश्चर्य आहे असें नाहीं. गुरूंचेही गुरु असे जे हे आमचे चरित्र नायक, याचें जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूण तालुक्यांतल्या हेदवी नांवाच्या लहानशा खेड्यांत, इ० स० १८४५ या वर्षीं झालें. जगत्प्रसिद्ध मोठ्या गजबजलेल्या राजधानी सारख्या शहरांत जन्मून,

× याच आशयाचीं प्रश्नोत्तर रूपी खालील दोन पद्यें पहाण्यासारखीं आहेत.

प्रश्न

रत्नागिरि हें स्थळ राहण्यास । रत्नाकराचा सहवास ज्यांस,
ऐसें असोनी जवळी न वित्त । रत्नागिऱ्या नाम तुम्हा विचित्र ॥१॥

उत्तर

विद्वद्रत्नें सर्व रत्नीं अमोल । हीरे यथें फार यांसी न तूल,
जेथें तेथें दाविती हे प्रभाव । आहे यांची सर्व लोकांत नाव. ॥२॥

अत्यंत क्षुल्लक विचारांनी अप्रसिद्ध स्थितींत राहण्यापेक्षां, क्षुल्लक खेड्यांत उत्पन्न होऊन, पोक्त व गंभीर विचारांनी जनसेवा करून, कीर्ति मिळवून जगत्प्रसिद्ध होणें, अत्यंत भूषणावह होय. हें जें हेद्दी नांवाचें लहानसें खेडें, हें ओकांचें मूळ गांव होय. या गांवीं यांचे पूर्वज कधीं, कोठून, व कशा करितां आले, या गोष्टींची चर्चा करण्यांत विशेष अर्थ आहे असें नाहीं. यांचे अत्यंत निकट संबंधीजनाविषयीं थोडासा विचार केला ह्मणजे पुरे आहे. यांचे वडील दाजी काशिनाथ ओक, हे चांगले संभावित गृहस्थ असून, त्यांचे पांचवे चिरंजीव आमचे चरित्र नायक होत. संस्कृत भाषांतर्गत भारत-भागवतादिकांचें सार, अव्याहत परिश्रमानें मयूरकवीनें जसें मराठींत आणिलें, तद्वत, ऐहिकज्ञानदृष्ट्या संस्कृताहून कांकणभर जास्तच अशी जी इंग्रेजी भाषा, निवळ मराठी जाणणारांस कठीण वाटणारी, तिचें प्राशन करून, समुद्राचें खारें पाणी पिऊन मेघ गोड करितात, किंवा पुष्परस पिऊन मधुमक्षिका त्यास अधिकच गोडी आणितात तद्वत, मराठींत सुलभ व सुबोध रीतीनें, पुस्तकरूपानें जो सतत आणीत असल्यामुळें, ज्याचें ओक हें उपनांव सार्थ झालें आहे, त्या विनायक रावजी ओकांचे, चरित्र नायक अत्यंत निकट संबंधी होत. मराठी वाङ्मयात या ओकद्वयानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. असो, वामन रावजींचा लहानपणचा विद्याभ्यास, घरींच तात्यापंतोजीच्या हाताखालीं झाला. त्यांना पुढला विद्याभ्यास ह्मटला ह्मणजे,-जगाच्या प्रत्येक भागांत जिचा ध्वनि प्रत्यहीं दुमदुमत आहे, मनुष्याचे हक्क जिनें सर्व जगास दाखविले आहेत, जगातील सर्व ज्ञानाचा जींत बहुतेक संग्रह झाला आहे, व मोठ्या झपाट्यानें ती, तो अधिकाधिक वाढवित आहे, आमच्या विद्या, आमच्या कला, आमचीं कौशल्यें यांची वाढ जिच्या साह्यानें मोठ्या जोमानें होत आहे, आमच्या देशी भाषांशीं जी सवती-मत्सरानें न वागतां, आपल्या अमोलिक भांडारानें त्यांस अधिकाधिक अलंकृत करीत आहे.

आमची प्राचीन स्थिति, आमच्या धर्मकल्पना, जगांतील अत्यंत उन्नत अशा आमच्या प्राचीन संस्कृत भाषेची खरी थोरवी, आमचे तत्वविचार इत्यादिकांची, अज्ञानानें जी आह्मांस विस्मृति पडली होती–नव्हे, आह्मी आह्मांस विसरलों होतों, तो आमचा विसर घालवून, आमची आह्मांस ओळख करून देत आहे; अशी जी अत्यंत उदार, अत्यंत सुधारलेली, अत्यंत महत्वाची जी इंग्रजी भाषा, तिचें अध्ययन करण्यास त्यांच्या वडिलांनीं त्यांस रत्नागिरी येथील विद्यालयांत घातिलें. आतां इंग्रजी भाषाज्ञानानें जीं सुष्ट कार्यें घडून येत आहेत ह्मणून वाणिलें, त्या करितांच वामनरावजींस इंग्रेजी शिकावयास त्यांच्या वडिलांनीं पाठविलें असेल, असें ह्मणण्यापेक्षां, आपल्या मुलास राजभाषेचीं चार अक्षरें साध्य होऊन त्याच्या पोटापाण्याची ददात सरावी, व त्यास सरकार–दरबारांत मान मिळावा" ह्मणूनच त्यांनीं पाठविलें असावें, हें ह्मणणें बहुत लोकांच्या सहजीं लक्षांत येण्यासारखें आहे. तें कांहीं असो परंतु, वडिलांच्या हेतूंहून आमच्या चरित्रनायकानें अधिक महत्वाची कामगिरी बजाविली आहे, यांत कांहीं शंका नाहीं. पोटाच्या पाठीस लागलेल्या रत्नागिऱ्यास शेतकी करण्यास साधनांचा अभाव, व्यापारांत गम्य नाहीं परंतु, विद्येकडे स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें, राजभाषेचें अल्पतरी ज्ञान संपादणें अवश्य झालें आहे. चरित्रनायकानें आंग्लभाषाप्रावीण्याच्या दर्शक ज्या उपपद-मालिका, त्या आपल्या नामाक्षररूपी शरीरावर लटकविलेल्या कोठें आढळत नाहींत, तरी तिच्या उदात्त विचारांचें इष्ट कार्य त्याच्या मनावर प्रस्तुत काळास अवश्य तितकें झालें होतें. रत्नागिरीस ते ज्या विद्यालयांत अभ्यास करीत, त्यावरील मुख्याध्यापक कांहीं सामान्य नव्हते. संस्कृत भाषेच्या प्रावीण्यामुळें, पाश्चात्य विश्वविद्यालयाकडून ज्यांस डाक्टर ही विद्वत्वसूचक बहुमानाची पदवी मिळाली आहे त्यांची योग्यता काय सांगावी! त्या डा. भांडारकर यांच्या हाताखालीं चरित्रनायकाचा अभ्यास झाल्यामुळें, व गुरुशिष्यांस संस्कृताची सारखीच आ-

वड असल्याकारणानें, या गुरुशिष्यांचें परस्परांवर फारच प्रेम असे.
वामनरावजींस गुरूचेही गुरु ह्मणून काव्यसंग्रहासंबंधानें जो मोठा मान
मिळाला, त्याचा पाया जें संस्कृत भाषेचें मर्मज्ञान, त्यासंबंधानें रत्ना-
गिरी विद्यालयांत असतांच त्यांची जिकडे तिकडे आख्या झाली होती.
इ० स० १८७० साली वामनरावजींची विश्वविद्यालयांत हात धरून
नेणारी जी मॉट्रिक्युलेशन नांवाची प्रवेश परीक्षा, तींत ते विजयी झाले.
संस्कृतांत ते निष्णात होते, याची साक्ष याच परीक्षेंत त्यांस त्यासंबंधानें
अत्यंत दुर्मीळ अशी जी जगन्नाथ शंकर शेट यांची दरमहा २१ रुप-
यांची स्कॉलरशिप ती मिळाल्यामुळें स्पष्ट होत आहे. ही स्कॉलरशिप
मिळालेले विद्यार्थी विश्वविद्यालयांत मोठे नामांकित विद्वान झाल्याचें
सर्वांस मशहूर आहे ह्मणून, विश्वविद्यालयाचा सर्व क्रम भर त्यांस नि-
र्वेध आक्रमितां आला असता तर, पदवीधरच ह्मणजे काय तो खरा
विद्वान, त्याखेरीज विद्वान असणें अशक्य, अशा बालिश विचारांच्या
लोकांवरही वामनरावजींचें तेज पडलें असतें. परंतु, केवळ खऱ्या विद्वा-
नांनीं किंवा मार्मिकांनींच मात्र त्यांची योग्यता जाणावी, अशीच यो-
जना असावीसें वाटतें. कारण, जरी ते एल्फिन्स्टन व विल्सन या प्र-
ख्यात विश्वविद्यालयांत शिकत होते, तरी कांहीं अपरिहार्य कारणामुळें,
त्यांस आपला गृहीत क्रम सोडून द्यावा लागला. एका अर्थी हेंही ब-
रेंच झालें ह्मणावयाचें. कारण, आमच्या तात्यापंतोजीच्या शाळांपासून
तहत विश्वविद्यालयापर्यंत शिक्षण देण्याचा क्रम असा कांहीं विलक्षण
आहे कीं, त्यामुळें विद्यार्थ्यांवर निरुपयोगी व अनावश्यक शिक्षणाचा
फार मोठा बोजा पडतो. त्याच्या भाराखालीं त्यांची नैसर्गिक हुरूप किंवा
आवेश किंवा जोम नष्टप्राय होतो. येथील व युरोपांतील विश्वविद्यालयांच्या
शिक्षणक्रमाची तुलना केली असतां असें आढळेल कीं, तेथल्यापेक्षां
येथील शिक्षणक्रम अधिक कठीण असून, तो परकी अर्थात अत्यंत बि-
कट अशा इंग्रेजी भाषेच्या द्वारें चालवावयाचा असल्यामुळें, अधिकच

कठिण झाला आहे. लेंचेपेंचे विद्यार्थी त्याच्या भाराखाली कधींच चिरडून जातात. शरीरानें मजबूत परंतु बुद्धीनें कमी, ते चक्कर मारण्यांत हैराण होतात. बुद्धिमान परंतु अशक्त, ते या भाराखालीं अधिकच अशक्त होतात. मग एखाद दुसरें उपपद मिळाल्यावर आपल्या श्रमाचें चीज भोगण्यास नोकरीसाठीं धडपडूं लागतात. ती तर हल्लीं फारच दुर्मीळ होत चालली आहे. मोठ्या कष्टानें ती मिळाली तर, तिचा उपभोग बरेच दिवस घेणारे भाग्यवान फारच थोडे असतात. उपपदें मिळविण्यास फार श्रम करावे लागल्यामुळें, त्यांस फार थकवा आलेला असतो ह्मणून, ते लौकरच राम ह्मणतात, किंवा जगलेच तर निरुत्साही तरी खास होतात. आतां सर्वत्र उपपदधाऱ्यांचा असा प्रकार होतो असा खोटा ग्रह कोणी करून घेऊं नये. कित्येक उपपदधारी शरीरानें व बुद्धीनें चांगले तरतरीत असून, हल्लीं मोठमोठ्या हुद्यांवर कामें करीत आहेत, किंवा सरस्वतीचें साम्राज्य वाढविण्यास मनापासून झटताहेत. परंतु, अशांची संख्या फारच थोडी आहे. सरकारी नोकरीची रौप्यशृंखला तोडून, खावंदचरणारविंदीं मिलिंदायमान होण्याचें सोडून, ज्यांनीं देशहितार्थ स्वखळावर विद्यादेवीचें दास्यत्व पतकरिलें आहे, अशांची संख्या हाताच्या बोटांवर मोजतां येण्यासारखी आहे. तेव्हां एकंदरींत विचार केला असतां असें आढळेल कीं, प्रस्तुत आमच्या विश्वविद्यालयाच्या शिक्षणक्रमानें साधारणतः जो निरुत्साह उत्पन्न होत असतो, त्याच्या तावडींत आमचे चरित्रनायक सांपडले नाहींत ह्मणून, कठीण शिक्षण भाराखालीं जो त्यांचा आवेश किंवा जोम दडपून गेला असता, तो काव्यसंग्रहाच्या प्रत्येक पानाच्या तळाशीं टीपारूपानें, व त्यांनीं केलेल्या सर्वमान्य गद्य व पद्य पुस्तकरूपानें आपणांस पहावयास सांपडत आहे. आतां ते उपपदधारी विद्वान असते, तर त्यांस काव्यांचीं अधिक परिस्फुटता करतां आली असतीच असें केवळ नाहीं. कारण, विद्वत्त्व व कवित्व या जोडीचें कितीसें सूत जमतें, याचें विवेचन निबं-

धर्माल्सिारख्या सर्वमान्य ग्रंथांत झालेंच आहे. त्यावरून असें स्पष्ट समजतें कीं, कवित्वाला विद्वत्व हें बहुतप्रसंगीं अडथळा करणारें असतें. आतां कवितेच्या अंगोपांगांचें ज्ञान होण्यास विद्वत्तेचें साह्य लागतें हें खरें आहे. अंगोपांगविचारास पुरून उरेशी विद्वत्ता वामनरावजींच्या ठायीं होती, व कवितेच्यासंबंधानें ह्मणाल तर, त्या विद्वत्तेच्या साह्यानें सतत परिश्रम करून त्यांनीं आपली प्रवीणता इतकी वाढविली होती कीं, या गोष्टींत त्यांचा हात धरणारा, उच्चतर उपपदधाऱ्यांतही कोणी असेल असें लक्षांत येत नाहीं. ह्मणून मोठमोठीं उपपदें मिळवून ते जर आपल्या हातीं घेतलेल्या कविताविषयांत कच्चे असते, तर हल्लीं उपपदविरहित पण कवितेंत निष्णात असल्यामुळें त्यांचा जो लौकिक पसरला आहे, त्याऐवजीं विरुद्ध प्रकार झाला असता,-नव्हे त्यांची अप्रतिष्ठा झाली असती, असें साफ ह्मणावयास कोणतीही हरकत नाहीं. विश्वविद्यालयांत किंवा पूर्वीं त्यांनीं जें अध्ययन केलें, तें पहिल्या वर्गांतील विद्यार्थ्यास शोभेसें होतें. पहिल्या वर्गाचे विद्यार्थी हे गाई-सारखे होत. मूठभर गवत खाऊन, व घोटभर पाणी पिऊन, गाय आह्मांस अमृततुल्य दूध देते. पहिल्या वर्गांतील विद्यार्थी थोडेंसें शिक्षण घेऊन विद्वत्तेचीं उत्कृष्ट रसाळ फळें आपल्या देशबांधवांस देतात. त्यास अनुसरूनच आमच्या वामनरावजींनीं वर्तन केलें. दुसऱ्या वर्गाचे विद्यार्थी पोपटासारखे असतात. ह्मणजे, त्यांस जें शिकवावें तेंच काय तें येतें. अधिक कांहीं समजत नाहीं. वामनरावजी जर या वर्गांतले असते, तर त्यांचे हातीं काव्यसंग्रहाचें काम देण्यास कोणीच भजला नसता. आणि काव्यविवेचनाचें काम ते स्वतःच करूं लागले असते, तर कवींच्या मूळ काव्यांहून त्यांत अधिक असें कांहींच नाहीं असें पाहून, त्यांकडे कोणी कुंकूनमुद्धां पाहिलें नसतें. तिसऱ्या वर्गाचे विद्यार्थी फुटक्या भांड्याप्रमाणें होत. त्यांत ओतलेलें पाणी हळूहळू झिरपून साफ नाहींसें होतें. त्याप्रमाणें जर वामनरावजींचें शिक्षण असतें, तर त्यांच्या वडिलांनीं

मी झीज सोसली ती व्यर्थ गेली असती, व विद्वद्वर्य डा० भाण्डारक-रांसारख्या गुरूंची मेहेनत व्यर्थ गेल्यामुळें, ते त्यांच्या प्रेमास अंतरले असते. फार काय सांगावें, त्यांनीं रत्नागिऱ्या ह्मणजे बुद्धिमान या विशेषणास काळिमा आणिली असती. नवख्या वर्गाचे विद्यार्थी उंसाचा रस गाळण्याच्या फडक्याप्रमाणें होत. चांगला गोड रस फडकें गळूं देतें, व केरकचरा, उंसाचा चोथा वगैरे त्याज्य भाग गच्च धरून ठेवितें, तद्वत चरित्रनायक असते, तर भारतभागवतासारख्या पुराणग्रंथांतील नीति, भक्ति, प्रीति इत्यादि विषयांसंबंधीं चांगले वर्णिलेले भाग अगदीं विसरून जाऊन, अत्यंत दुष्टजनाच्या नीतिभ्रष्ट व भक्तिनष्ट कथा, कांहीं उद्देशानें—ह्मणजे त्यांचा परिणाम किती वाईट होतो, व सत्याचा कसा जय होतो हें दाखविण्याकरितां—मुद्दाम वर्णिल्या आहेत त्याचे उद्देश मनांत न वागवितां, केवळ त्या अरिष्टोत्पादक कथा स्मरणांत ठेविल्या असत्या, व असल्या कथा पुराणांत आहेत ह्मणून, 'आमचीं पुराणें शिमगा आहे यास्तव, पुराणग्रंथ गाढवांवर लादून समुद्रांत फेंकून द्यावे'! अशाप्रकारचे बाष्कळ व पोरकट विचार त्यांनीं प्रदर्शित केले असते. परंतु, मराठी कवितेचें नशीब थोर ह्मणून, वामनरावजींचा विद्यार्थीदशेंतला क्रम प्रस्तुत वर्णिलेल्या नवतर वर्गाकडे न फिरतां, तो अत्यंत उच्चतर वर्गाकडे वळला यामुळेंच त्याचें एवढें देव्हारें माजलें आहे. असो, या प्रमाणें बहुफलदायक आपला विद्याविक्रम चालवितां आला तितका चालवून, विश्वविद्यालयास शेवटला रामराम ठोकून, आमचे चरित्रनायक आपल्या मेहनतीच्या फळांचा स्वाद घेण्यास, आपल्या देशाच्या ह्मणजे हिंदुस्थानच्या मध्यप्रांतांतील, नागपूरमधल्या सिटिस्कूलांत, इ० स० १८७५ यावर्षी उपगुरूचें काम करण्याकरितां आले.—नव्हे अणुं काय ते येथें आपल्या धवलकीर्तिमंदिराच्या मध्यगृहां-तच शिरले असें वाटतें. कारण, ते या ठिकाणीं असतां, साहेबी थाटा-वर नात चाललेल्या मराठी भाषेस तीर्थ देऊन तिला सोंवळी करून

घेणाऱ्या भट्टाचा, किंवा आङ्ग्लभाषाज्ञानलवदुर्विदग्ध अज्ञ, किंवा तीत प्रवीण अशा तज्ञ, अतिरथी महारथींनीं, मराठी ह्मणजे पुळकट, तिला नानाविध मानवमनोवृत्ति यथातथ्य प्रकट करण्याचें अवसान नाहीं, अशी बडबड चालविली होती, त्यांवर आपल्या प्रखर लेखणीनें निबंधमालारूपी भात्यांतून जोमदार व तीक्ष्ण अशा शब्दबाणांनीं समर्पक शरसंधान करून, त्यांस मराठीची अश्रुतपूर्व खरी योग्यता जाणावयास लाविलें, व भवसागरांत गटकळ्या खाणारे लोक, हरि मायेच्या मोहास गुंतून, ८४शींच्या फेऱ्यांत सांपडून, पुनः पुनः जन्मास येतात तद्वत, मातृवत् मानिलेल्या आपल्या मराठी भाषेस ज्यानें मोहक रूप दिल्यामुळें, तीतिल त्यानेंच बनविलेल्या निबंधमालेच्या सप्तवर्षात्मक अर्थात् ८४ अंकांच्या फेऱ्यांत, जो रसिक वाचक ह्मणून सांपडला, त्यास तिच्या मोहामुळें वाचन रूपानें पुनः पुनः जन्म घ्यावे लागत आहेत! अशा विलक्षण सामर्थ्याच्या लेखनकला निपुणानें, मयूरकवीच्या कवित्वावर आक्षेप घेणाऱ्या प्रतिपक्षांवर, त्यांतून विशेषतः बृहस्पतीची पदवी संपादिलेल्या प्रत्यक्ष आपल्या बापावर शरप्रहार करून, मयूरकवित्वाची सकल विद्वन्मंडळांत व रसिक–गणांत ख्याति गाजविली त्या भटाचा, व आमच्या चरित्रनायकाचा मोठ्या ईर्षेचा सामना झाला. त्याचें कारण असें.–निबंधमालेचे जनक जे विष्णुशास्त्री, यांनीं मोरोपंताच्या कवितेचें गुणदोष–निरूपण करण्यास आरंभ केला. त्याचा हेतु इतकाच कीं, पंतांची खरी योग्यता न जाणतां कित्येक हरिदास, पुराणीक, व शास्त्री त्यांच्या आर्येचे दहा दहा अर्थ होतात असा आपला मिथ्याग्रह करून घेऊन, पंतांस पूज्य मानीत होते दुसऱ्यापक्षा कांहीं आङ्ग्लभाषा पंडितांनीं, मोरोपंत हा कवि होताकीं भाषांतरकार होता, याबद्दल भवतिनभवति चालविली होती. ह्मणजे, एका पक्षानें त्याच्या नसत्या गुणांची प्रौढी चालविली होती, तर दुसऱ्या पक्षानें त्याच्या असलेल्या गुणांचें मातेरें करण्याचा प्रसंग आणिला

होता. या उभयपक्षांच्या चुका त्यांच्या पदरांत घालून, पंतांची खरी योग्यता सर्व लोकांस कळवावी ह्मणून, मालेच्या जनकानें आपल्या मालेंत जे परचरित निबंध लिहिले आहेत, त्यांवरून त्यांची विद्वत्ता व मोरोपंतांची खरी योग्यता, या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं दिसून येतात. आतां त्यांच्या सरहू लेखांत अहंमन्यतेचा व थोडासा अदूरदृष्टीचाही भाग आहे. मोठमोठ्या पराक्रमी विभूतींस कारणवशात् स्वसामर्थ्याचा गर्व झाला असतां, त्यांचा तो गर्व त्यांहून कमी योग्यता मानिलेल्या व्यक्तींकडून नाहींसा झाल्याच्या गोष्टी आपणांस पुष्कळ ठाऊक आहेत, त्यांपैकींच एक गोष्ट येथें सांगण्याचा प्रसंग आला आहे. सर्व जगाला विष्णु जसा पुरून उरला आहे, त्याप्रमाणें महाराष्ट्र भाषेचा अधिकार चालविण्यास ज्याची शक्ति पुरून उरली आहे, असा मालेचा जनक विष्णु आपल्या सामर्थ्यानें मोठा बली भासत होता. निबंधमाला ही जणूंकाय त्याची राजधानी होती. आमचा चरित्रनायक वामन याच्या हातीं कांहीं प्रसिद्धिकरण साधन नव्हतें ह्मणून, बटुवामनानें ज्या प्रमाणें बली सबळ त्यास पादाक्रांत करण्याच्या बुद्धीनें ३ पावलें जमीन मागितली तद्वत, आमच्या वामनानें निबंधमालेंत आपलीं २ अक्षरें प्रसिद्ध करण्याची याचना केली. वामनानें मागितलेलें दान देण्यांत आपलें कांहीं नुकसान होईल असें, बली प्रमाणें मालेच्या पित्यासही वाटलें नाहीं. वामनाचें एकेक पाऊल विस्तीर्ण होत गेलें, व शेवटीं दात्यास पादाक्रांत करण्यास कारण झालें तद्वत, चरित्रनायक वामनाच्या लेखांचें आरंभीचें रूप अत्यंत शांत, सौम्य व सूक्ष्म असून, पुढें पुढें तें फार विस्ताराचें व कडक होत गेलें आहे, व शेवटीं तर मालेच्या जनकास त्यानें चुका कबूल करावयास लाविलें आहे. जिंकलेल्या बळीच्या लोकांतरींच्या राज्यगृहांत वामन त्याचा द्वारपाळ झाला, तद्वत मालाधिपतींच्या काव्येतिहास संग्रह नांवाच्या अन्य राजगृहाशीं सदृश जो काव्यसंग्रह त्यांत, विष्णुघृत मयूर कवितेचे नामचे चरित्रनायक आमरण द्वारानुदास होऊन राहि-

त्याचें सर्वश्रुत आहे. वामनानें बलीस पदच्युत केल्यामुळें त्याची यो-ग्यता कमी झाली असें नाहीं. प्रत्येक वर्षारंभीं किंवा कार्तिक शुद्ध प्रतिपदेस " इडा पिडा टळो व बलीचें राज्य येवो " अशा मंगल आवाहनानें लोक त्याचा जयघोष करीत असल्यामुळें त्याची योग्यता व्यक्त होत आहे. महापराक्रमी जो नेपोलियन बोनापार्ट, त्यास जरी ड्यूक आफ वेलिंग्तन यानें जिंकिलें तरी, शौर्यवर्णन प्रसंगीं, त्याहून-युरोपखंडास चळचळ कांपविणाऱ्या नेपोलियनाचेंच नांव चटकन लक्षांत येतें. या दोन दृष्टांतरूप गोष्टी लक्षांत वागविल्यास, चरित्रनायक व मालाजनक यांवर जें रूपक केलें आहे, त्यासंबंधानें शास्त्रीबोवांच्या निःसीम भक्तास विषाद वाटण्याचें कांहीं कारण उरणार नाहीं. प्रस्तुत रूपक केलें नसतें, तरी चरित्राची छानी बिघडली असती असें नाहीं, असे उद्गार कित्येक मालाभक्त काढतील हें आम्ही जाणून आहों परंतु, मोठ-मोठ्याचें गर्व–हरण कसें अकल्पित होत असतें, हें त्यांत बहारीनें वर्णितां आल्यामुळें, त्याचा अंगीकार करण्याकडे मन वेधलें. मालाजनक–भक्त म्हणवून घेण्यांत आम्हांस मोठें भूषण वाटत आहे. मालाजनकावर जय मिळविल्यामुळें, आमच्या चरित्रनायकाची कीर्ति महाराष्ट्रभर पसरूं ला-गली, व त्यासारखा महाराष्ट्र कवितेचा मर्मज्ञ क्वचितच असेल असे उद्गार जिकडे तिकडे दुमदुमूं लागले. हा विष्णुवामनाचा संग्राम ज्यांस पहा-वयाचा असेल, त्यांस तो निबंध-मालेंत आढळेल. विद्वान व मार्मिक वादीप्रतिवादी कसा सभ्यपणानें वाद करितात, व कोणत्याही गोष्टीचें सत्यस्वरूप लोकांस कळावें म्हणून, बिचारे त्यांचे श्रम कसे चाललेले असतात, इत्यादि बहुत गोष्टी त्यावरून कळण्यासारख्या आहेत. राम-रावणाचें युद्ध प्रत्यक्ष पाहण्यास पुढील लोकांस कांहीं साधन नाहीं म्हणून, रामायणकाव्यरूपी त्याच्या छबीवरून त्याची कल्पना करण्या-खेरीज अन्य मार्ग नाहीं परंतु, विष्णु-वामन युद्ध लेखनरूपानें जसें झालें तसेंच्या तसें आजच नव्हे, परंतु मराठीभाषेचें अस्तित्व असेपर्यंत वाच-

कांस पहावयास मिळणार आहे, हा केवढा चमत्कार आहे ! राम-रावण-युद्धांतील उद्देशाचें अनुकरण करण्याचा जरा कोणी प्रयत्न करीत आहे, अशी आमच्या सरकारास अत्यल्प शंका येतांच, त्यास सरकार बंदीत टाकील परंतु, विष्णुवामन युद्धासारखीं अनंत युद्धें अहोरात्र, लोकांनीं करावीं, अशाबद्दल दयाळु व विद्यावृद्धीच्छु सरकार मनापासून परिश्रम करीत आहे ह्मणून, प्रस्तुतकाळीं निर्भय असें जें त्या युद्धाचें अनुकरण तें लोकांनीं अवश्य करावें,

बृहस्पतिपुत्र विष्णुशास्त्री यांशीं वाद करण्यांत जय मिळाला तरी, वामनरावजींस गर्वाची बाधा झाली नाहीं. उलट ते अधिकच नम्र झाले. कारण, त्यांवर विद्येचा फार चांगला परिणाम झाला होता. 'विद्या ददाति विनयं ' ही ह्मण सर्वश्रुत आहे. आपल्या आवडत्या विषयांत जय मिळाल्यामुळें, त्याच विषयाचा ते मनापासून अधिक परिश्रम करूं लागले. प्रथमपासूनच ते लक्षपूर्वक अध्ययन करीत. त्याहून, गुरूचें काम करूं लागल्यापासून, तें फारच उत्तम रीतीनें होऊं लागलें. उघडच आहे कीं, शिकवूं लागल्यावरच आपलें खरें शिकणें होत असतें. कितीही मोठा बुद्धिमान मनुष्य असला तरी, शिकते वेळीं प्रत्येक विषयाचीं सर्व अंगें व उपांगें त्याच्या आकलन शक्तींत येणें अशक्य आहे. परंतु, नानाविध-मतींच्यां विद्यार्थ्यांच्या दृक्पथांत आलेल्या शंकांचें निवारण करण्या करतां, शिक्षक जें कांहीं शिकतो तेंच खरें शिकणें होय. विद्यार्थ्यांच्या शंकासमाधानापेक्षां जाड्या विद्वानाच्या मताची सदोषता दाखविण्यास विलक्षण अध्ययनाची गरज असते. त्याप्रकारचें अध्ययन व अध्यापन ते करीत असतां, काव्यांत त्यांची किती गति झाली होती, हें दर्शविण्यास घटियंत्राचा दृष्टांत अत्यंत समर्पक होय. जलयुक्त गंगाळयांत ठेविलेलें रितें घटिकायंत्र, थोडथोडें पाणी ग्रहण करून तंतोतंत भरतें व, पुढें तें त्यांत बुडून जातें तद्वत, बालपणापासून महाराष्ट्र काव्यनिधींतून त्याचें मनरूपी घटिकापात्र थोडथोडें काव्यर-

सानें भरत जाऊन अखेरीस त्यांतच गढून गेलें. अगदीं पार गढून गेलें! तेव्हां त्यांची काव्यमर्मज्ञ अशी सर्वत्र ख्याति व्हावी यांत कांहीं नवल नाहीं. काव्यरस समुद्रांत, किंवा कीर्तीच्या मध्यगृहांत, किंवा नागपूरच्या सिटिस्कुलांत, इ० स० १८७५ पासून १८८३ सालापर्यंत आमचे चरित्रनायक त्या विद्यालयाचे मुख्य गुरु झाले. तेथें कांहीं भानगडी उत्पन्न होऊन, १८८४ सालीं त्यांनीं ती जागा सोडिली. साधारणतः कवि ह्मटला ह्मणजे तो आपला भानगडींत सांपडावयाचाच! ही जागा सोडल्यावर वामनरावजी नागपूरच्या मेलनार्मल स्कुलाचे सुपरिंटेंडंट बनले. नंतर संबलपूरच्या हायस्कुलावरील मुख्य अध्यापक झाले. अधि-काऱ्यांस संतुष्टी उत्पन्न होण्यासारखें तेथें त्यांनीं ९ वर्षें काम केलें. हें काम करीत असतांच, मोहमयी नगरींतील प्रख्यात जावजी दादाजी शेट यांणीं आपल्या निर्णयसागरांतून मुद्रणरूपानें, देवदानवांनीं समुद्र-मंथन करून काढिलेल्या चतुर्दश रत्नांतील चंद्ररत्नाप्रमाणें, प्रतिमासास नवस्वरूप धारण करून उदय पावणारीं बालबोध, काव्यमाला, काव्य-संग्रह हीं मासिकें सुरू केलीं होतीं, त्यांपैकीं काव्यसंग्रह रत्नभांडारावर प्रख्यात व लोकमान्य विद्वान जनार्दन बाळाजी मोडक यांस नेमिलें होतें. त्यांस इ० स० १८९० यावर्षीं दुष्ट काळानें ओढून नेल्यामुळें, त्यांचें काम निर्णयसागर मुद्रणाधिपतींनीं मोठ्या आग्रहानें व प्रेमानें आमच्या चरित्रनायकाकडून पतकरविलें, तें त्यांनीं अत्यंत उत्कृष्टपणानें अखेरपर्यंत केल्याचें पूर्वीं वर्णिलेंच आहे, तें आमचें वर्णन किती खरें आहे, याची साक्षी-पुरावा घेऊन प्रतीत पाहण्याची इच्छा असेल त्यांनीं, वामनरावजींच्या या गुणाबद्दल, मराठी पत्रांनीं व मोठमोठ्या विद्वानांनीं मनापासून जे आपले अनुकूल अभिप्राय प्रगट केले आहेत, ते वाचून पहावे ह्मणजे खातरी होईल. किंवा असें तरी कशाला हवें. आह्मी वाचकांनां वामनरावजींस मिळालेले चांगले अभिप्राय पहा, आणि मग त्यांचें गौरव करा असें सांगूं इच्छित नाहीं. आंगात फारसे गुण नसतां

आपल्या धन्याची किंवा वरिष्ठाची मिन्नतवारी करून, भिडेच्या मिळविलेल्या अभिप्रायांनीं कपाटांचीं कपाटें भरून ठेवणारे बहुत लोक आहेत. कित्येकांच्या सर्टिफिकिटांत वर्णिलेल्या गुणांचा शतांशही त्यांच्या आचरणांत दिसून येत नाहीं ह्मणून, वाचकांस आह्मीं अशी शिफारस करितों कीं त्यांच्या अभिप्रायांपेक्षां त्यांचें काव्यार्थ प्रकटीकरणाचें ज्ञान प्रत्यक्ष पहा. ह्मणजे 'चक्षुर्वैसत्यं' त्यांचें खरें महत्व कळेल. वामनरावजींस मिळालेल्या चांगल्या अभिप्रायांनीं त्यांची योग्यता वाढली असें आह्मांस वाटत नाहीं. कनिष्ठाचें कल्याण व्हावें ह्मणून श्रेष्ठानें काढिलेले उद्गार अभिप्राय होत. व श्रेष्ठाच्या सुष्ट व वरिष्ठ गुणांबद्दल कनिष्ठानें प्रदर्शित केलेले विचारही अभिप्रायच होत. काव्यार्थ विशदीकरणांत वामनरावजींचा हात धरणारा—नव्हे त्यांचें गुरुत्व स्वीकारणाराच पहिल्या प्रकारचा अभिप्राय देण्यास पात्र आहे, तो कोण आहे त्याची आह्मांस माहिती नाहीं. वामनरावजींचें महत्व जाणण्यास त्यांचे अभिप्राय पाहण्याची आह्मीं इच्छा करीत नाहीं. त्यांच्या प्रत्यक्ष गुणनिरीक्षणानें त्यांचें मोठेपण आमच्या मनात बाणलें आहे. सूर्याचा प्रकाश स्वच्छ असतो, असें ह्मटल्यानें सूर्यप्रकाशाची महती वाढली असें नाहीं परंतु, सूर्यप्रकाशाची ज्यांस माहिती नाहीं त्यांस प्रकाशाचा एक गुण समजला इतकें मात्र खरें, त्याचप्रमाणें वामनरावजींच्या अभिप्रायांतर्गत खऱ्या गुणांच्या उल्लेखानें, त्यांची माहिती नसलेल्या लोकांस त्यांच्या खऱ्या गुणांचें ज्ञान झालें. वाल्मिकीच्या रामायणावरून त्याच्या कवित्वगुणाची कीर्ति झाली, त्या रामायणामुळेंच श्रीरामचंद्राचा अतुल पराक्रम लोकांस कळून आला. त्याचप्रमाणें, ज्या वामनाच्या काव्यपरिस्फुटतेवरून त्यास लोक धन्य मानूं लागले, त्या काव्यपरिस्फुटतेमुळेंच मराठी काव्यांचा जोम, त्यांचें गांभीर्य, त्यांचा उदात्तपणा ही हीं लोकांस कळून चुकलीं. ज्या महाराष्ट्र काव्यांचा पूर्वी अर्थ न कळल्यामुळें, आंग्लभाषा पंडितांस तीं वन्य किंवा पोरकट अर्थात व्यर्थ भासत होतीं, तीच काव्यें वामनरावजींच्या प्रयत्नानें सार्थ

होतांच त्यांस महत्वाची, व विश्वविद्यालयांतही शिकविण्यास योग्य वाटूं लागली ! काव्यें ह्मणाल तर तीं पूर्वीं होतीं तींच हल्लीं आहेत. तर मग पूर्वीं त्यांसंबंधानें जो तिटकारा दाखविण्यांत येई याचें कारण, तीं कळत नसत याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. आतां हा दोष त्या काव्यांचा कीं, तीं समजून न घेणाऱ्या आँग्लभाषा पंडितांचा, याचा निर्णय एखादें लहान मूलही करील. थोडेंसें मराठी जाणणाऱ्या मिशनरी पंडितास साध्याभोळ्या भाषेनें कविता रचणाऱ्या तुकारामाची कविता समजल्यामुळें, त्यांच्या गाथांचें भाग्य उदयास येऊन पाश्चिमात्य लायब्रऱ्यांतून त्या चमकूं लागल्या आहेत. मोरोपंतासारख्या पंडिताची कविता त्यांस दुर्गम असल्यामुळें, तिचें तिकडे अद्याप प्रयाण झालें नाहीं. दूरची गोष्ट राहूं द्या. आमच्याच देशांतल्या विश्वविद्यालयांत तिचा प्रवेश कधीं होईल तो सुदिन. तो दिवस महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्या इतक्या योग्यतेचा होईल. व त्याचवेळीं आमच्या चारित्रनायकाच्या नांवाचें स्मरण झाल्याखेरीज रहावयाचें नाहीं.

आमचे चरित्रनायक याप्रमाणें काव्यसंग्रहाचें काम मोठ्या शहाणपणानें चालवीत असतां, इ. स. १८९१ सालीं शाळाखात्यांतील त्यांच्या पूर्वीच्या जाग्यावरून त्यांची बदली, रायपूरच्या हायस्कुलावरील हेडमास्तरच्या जाग्यावर झाली, त्या जाग्यावर ते अखेरपर्यंत होते. वामनरावजी उत्तम गुरु होते—नव्हे ते गुरूंचेही गुरु होते. काव्यज्ञानासंबंधानें तर त्यांस ही योग्यता खचित होती. आमच्या शाळांतील क्रमिक पुस्तकांच्याद्वारें, मयुरादि कवींचीं जीं तुरळक काव्यशकलें शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांस शिकवितात त्यांचें तरी मार्मिक ज्ञान त्यांस कितीसें असतें ! काव्यसंग्रहासारख्या, अर्थाची फोड केलेल्या कविता असतील तरच त्यांस त्या नीट शिकवितां येतील, सूर्यापासून तेज घेऊन आकाशांत चंद्र प्रकाशमान होऊन, त्या प्रकाशानें सर्व जीवलोक आनंदित करितो. तद्वत, काव्यज्ञानरूपी आमच्या चरित्रनायकवत् सूर्याचें तेज घेऊन शिक्षक-

रूपी चंद्र विद्यालयांत विद्यार्थ्यांच्या मनावर प्रकाश पाडण्यास समर्थ होतो. गुरूसही शिकविण्याची ज्याची योग्यता आहे, तो आपल्या शिष्यांस किती उत्तम रीतीनें शिकवीत असेल हें सांगणें नको. कित्येकांस शंका येईल कीं, जो मोठें काम करितो त्यास लहान काम करितां येईलच असें नाहीं, आणि ही शंका जरी संभवनीय आहे तरी, वामनरावजीं सारख्या विद्वानांसंबंधानें त्या शंकेचें अस्तित्व उरत नाहीं. कारण, ते मोठ्याशीं मोठे होत, व लहानाशीं लहान होत असत. बटु वामन ज्याप्रमाणें बलीशीं मोठा विश्वव्यापाक झाला, त्याप्रमाणें निबंधमाला-वनकांसारख्यांशीं वामनराव मोठें पांडित्य दाखवीत आणि, आपल्या विद्यालयांतील अज्ञान बालविद्यार्थ्यांशीं अगदीं बालबोध रीतीनें भाषण करीत ह्मणजे, ते बाल होत. विद्यार्थ्यांचें आपणाकडे लक्ष लावून घेण्यास गुरूस विद्यार्थी व्हावें लागतें, तो गुण त्यांमध्यें होता ह्मणूनच सर्व विद्यार्थ्यांचें चित्त त्यांकडे गुंतलेलें असे.

शिष्यांचें वित्त हरिति ॥ गुरु अपरंपार या जगीं असती
शिष्यांचें चित्त हरिति ॥ गुरु ऐसे फारसे जगीं नसती

शिष्यांचें चित्त हरण करणाऱ्या दुर्मीळ गुरूंपैकीं वामन रावजी एक गुरु होते, ह्मणूनच त्यांच्या अधिकारीवर्गाकडून त्यांस शाबासकी मिळाली, व विद्यार्थ्यांनीं त्यांचा धन्यवाद केला, व ते उत्तम शिक्षक ह्मणून त्यांची सर्वत्र ख्याति पसरली. खरोखर उत्तम शिक्षक ह्मणवून घेणें हा केवढा मोठा मान आहे बरें! पण तो कोठें? उन्नतावस्थेस जोरानें चाललेल्या पाश्चात्य राष्ट्रांत किंवा सुधारणागिरीवर आरूढ झालेल्या आमच्याच प्राचीन राष्ट्रांत. पूर्वीं शिक्षकाचें काम ब्राह्मण करीत, त्यांची योग्यता किती असे हें सर्व श्रुत आहे. प्रस्तुत अवनतींत रुळत असलेल्या आमच्या देशांत शिक्षक हा शब्द तुच्छतेचा दर्शक बनला आहे! नानाविध उपयुक्त व मनोहरकलांत जिचें प्रावीण्य दिसून येई, तीस प्राचीनकाळीं कलावती हा बहुमानाचा शब्द योजीत असत. कुलस्त्रियांच्या

गायनवादनादि कलांचा आमच्या विपन्नावस्थेंत बाजारबसव्या वेश्यांनीं अंगीकार केल्यामुळें,, त्यांच्या नीचपणामुळें कलावती शब्दाचें कळवांताण हें अपभ्रष्ट रूप फारच असभ्यपणाचें दर्शक बनलें आहे! शब्दांस चिकटून का कोठें सभ्यता किंवा हलकटपणा असतो! सभ्यलोकांचे दर्शक शब्द सभ्य, व हलकट लोकांचे दर्शक शब्द हलकट मानले जातात. बाजारबसव्या वेश्यांनीं कलावती शब्द हलकट करून सोडला तद्वत, असमंजस व अयोग्य लोक शिक्षकाचें काम करूं लागल्यामुळें शिक्षक शब्दास कमीपणा आला. सुधारणा करणें ह्मणजे वाईटाचें चांगलें करणें होय. अंगीं योग्यता नसतांही केवळ पोटाखातर निरुपायास्तव शिक्षकाचें काम करावयाचें असें न करतां, विलक्षण ज्ञान, सुविनय, व श्लाघ्य गुण संपादून जर आमचा शिक्षकगण लोकांवर छाप बसेसें आपलें काम करूं लागला, तर शिक्षक हा मोठ्या प्रतिष्ठेचा शब्द होण्यास अवकाश लागणार नाहीं. अहाहा! आज जगांत जें कांहीं मंगलमय दिसत आहे तें सर्व उत्तम शिक्षकांच्या प्रयत्नाचें फल होय. मोठमोठे अमीर उमराव, मोठमोठे पातशाहा, मोठमोठे चक्रवर्ती राजाधिराज यांहून, उत्तम शिक्षकाची योग्यता मोठी आहे. जगद्विख्यात आंग्लभाषेंतील रसिक कवि शिरोमणी मिल्तन यानें विद्यार्थ्यांस शिकविण्यास शाळा घातली होती. आतां सर्वच कवि शाळा घालून घांटीपाटीच्या साह्यानें शिकवितात असें नाहीं. कवि आपल्या काव्यांनीं, वक्ते आपल्या वक्तृत्वानें, नाट्याचार्य आपल्या मनोहर नाटक प्रयोगांनीं, धर्मसंस्थापक—किंवा प्रसारक आपल्या गंभीर उपदेशांनीं लोकांस शिक्षण देत असतात. जगाच्या बहुतेक अर्ध्या लोकसंख्येनें ज्याचा धर्म स्वीकारिला आहे, त्या महात्म्या धर्मस्थापक गौतम बुद्धानें अश्रुतपूर्व उपदेशकप्रेरणेची, धर्मप्रसारार्थ नवीन तऱ्हा काढल्यामुळेंच त्याचा धर्म इतका पसरला, असें इतिहासज्ञांचें मत आहे. या महात्म्याच्या जन्मकाळीं एका भल्यात ज्योतिषानें, किंवा भविष्यवाद्यानें याच्या भावी आयुष्यक्रमाचें असें भविष्य कथन केलें

होतें कीं हा एक तर मोठा चक्रवर्ती राजाधिराज होईल, किंवा सर्व जगास शिकविणारा मोठा धर्मोपदेशक किंवा शिक्षक होईल. ज्योतिषी बवांचे पहिले उद्गार जर खरे झाले असते तर, फार झाल्यास गौतम बुद्ध इतिहासांत गाजला असता परंतु, चमत्कार काय झाला पहा. तो शाक्य सिंह नांवाचा, एका बलिष्ठ राजाचा पुत्र असतां, राज्याचा सर्वस्वी त्याग करून, धर्मोपदेशक अर्थात शिक्षक ह्मणवून घेण्याकरितां, अत्यंत दीन यति बनला! ह्मणुनच आज त्याचें नांव, जगभर पसरणारा त्याचा विस्तृत धर्म गाजवीत आहे. तेव्हां राज्याधिकार मिळवून प्रजेच्या रक्ताचे समुद्र वाहविण्यापेक्षां, किंवा लोकांच्या माना मुरगाळण्यापेक्षां अत्यंत विनयसंपन्न शिक्षक होऊन, विद्यार्थ्यांचें मन आकर्षण करून घेऊन, त्यांचें मन सुसंस्कृत करून, लोकांचे हितकर्ते त्यांस बनविणें, अत्यंत मंगल कृत्य होय. तें राज्याधिकारापेक्षां अधिक योग्यतेचें व सन्माननीय होय. ह्मणून वामनरावजींच्या चरित्रावरून असें शिकावें कीं, मानपानास भुलून अधिकार प्राप्त करून घेण्याच्या खटपटीस न लागतां उत्तम शिक्षक होण्यास झटावें. ही वामनरावजींच्या चरित्रापासून शिकण्यासारखी पहिली गोष्ट होय.

विद्यादेवीच्या राज्याचें क्षेत्र वाढविण्यांत आमचे चरित्र नायक गुंतले असतां, अध्ययन व अध्यापन या दोन्ही गोष्टींत त्यांचा जबर व्यासंग चालला होता. 'सदा रोगी व सदा उद्योगी' या ह्मणीप्रमाणें जरी सांगण्यासारखा त्यांस मोठासा रोग जडला नव्हता, तरी हृद्रोग किंवा चिंता त्यांच्या पाठीशीं सदा उभी असल्यामुळें, त्याची प्रकृती सदा झुरुमुरु करीत होती तरी, त्या स्थितींत ते ग्रंथप्रकाशनाच्या उद्योगांत सदा गुंतलेले असत. यामुळें, हतवीर्य होऊन आळसानें त्यांस अगदीं सोडून दिलें. त्यांचें कुटुंब निवर्तल्यामुळें लहान मुलांच्या जोगवणीचें व प्रपंचाचें सगळें ओझें ७।८ वर्षे त्यांच्या शिरावर पडलें होतें. विद्यार्थ्यांस शिकविण्याची उरस्फोड चाललीच होती त्यामुळें, डोक्यास व तोंडास विसावा नव्हता.

काव्यसंग्रहांतून कवींचें अत्यंत खोल व गूढ हृद्गत हुडकून काढून तें लेखन रूपानें प्रसिद्ध करण्यांत हातास शीण पडत होते. महाराष्ट्र कविता भांडागारांतून शेंकडों शेंकडों कविता मौक्तिक निवडून काढून, त्यांचे सर गुंफून काव्यसंग्रहाच्या प्रत्येक अंकांत ते गोंवून, त्यास खरेदी करणारे वाचक-ग्राहक, किंवा आश्रयदाते ठिकठिकाणी धुंडून काढण्यास कल्पना शक्तीस फार ताण द्यावा लागत होता. शिवाय, भरींवभर आणखीं आवडतीं परंतु अप्रसिद्ध अशीं मयूरमुखमौक्तिकें किंवा त्यांच्या कविता, त्यांच्या जन्मभूमीजवळ मिळण्याचा संभव-तीं प्रयत्नानें शोधून काढावयाचीं होतीं. म्हणून, प्रवासाचे श्रम सोसून पंढरपुरास जाण्याकरितां मायजी पर्यंत ते आले होते. परंतु काय दुःखाची गोष्ट पहा! महाराष्ट्र कवितेच्या किंवा अधिक समर्पकपणानें म्हणावयाचें म्हणजे तिच्या भोक्त्यांच्या दुर्दैवानें आमचे चरित्र नायक आजारी पडून तेथून नागपुरास परत आले. अर्वाचीन अनुभववेद्यशास्त्रांच्या जनकानें किंवा लार्ड बेकन यानें त्या शास्त्रांतील अनेक विषयांचा अनुभव घेत असतां, शास्त्राधिदेवतेस आपल्या प्राणाचें उपायन देऊन संतुष्ट करण्याकरितांच जणुं काय बर्फानें पक्षास मढवून तो कुजतो कीं काय, हा प्रयोग करण्यांतच आपलें आयुष्य वेचिलें. कारण ह्मातारपणाच्या अशक्ततेंत बर्फाच्या शिसारीनें त्यास ताप येऊन त्यांतच त्याचा अंत झाला. त्या सारखाच आमच्या चरित्र नायकाचा प्रकार झाला. बेकनचा हेतु शास्त्रज्ञान लोकांत प्रसृत करावें असा होता, व काव्य शास्त्रांचा लोकांत प्रसार व्हावा असा वामनराव जींचा हेतु होता. नागपुरास आल्यावर त्रासानें त्यांच्या क्षीण झालेल्या प्रकृतीस आजारानें फारच घेरलें. त्यांचें दुखणें वाढतां वाढतां विकोपास गेलें. त्या दुखण्यांतच महाराष्ट्रकाव्य प्रकाशक चंद्रावर मृत्युरूपी राहूनें आपली छाया पाडिली. त्या दुष्ट व निर्घृण चांडाळानें किंवा काळानें त्यांस पूर्ण ग्रासून, ता. १३ जून इ. स १८९७ रोजीं रात्रीचे ११ वाजतां जिकडे तिकडे सामसूम होत आहे असें पाहून, दिवे मालवून लोक

निद्रावश होताहेत तोंच, आमच्या चरित्रनायकाच्या काव्य स्नेहानेंच जणुंकाय हा वेळपर्यंत प्रज्वलित असलेली-प्राणज्योती नष्ट करून, सर्व रसिकजन मंडळींत अंधेरच अंधेर पसरला! "हाय हाय! हे महाराष्ट्र कविते, गेला तुझा वाली गेला बरें! असा तुला दुसरा वाली मिळण्यास किती दिवस लागतील कोण जाणे!" अशा शोकजनक विलाप रवांनीं अखिल महाराष्ट्रांतील काव्यसंग्रह वाचकांनीं व त्यांच्या आप्तइष्टांनीं डोळ्यांतून टपाटप टिपें गाळिलीं. दुःखानळानें भाजून गेल्यामुळें कृष्ण-वर्ण बनलेलीं तीं टिपें, शाईच्या रूपाप्रत जाऊन त्यांचे वाळलेले शिट-काव वर्तमानपत्रांतील वामनरावजींच्या मृत्युवार्तेच्या दुःखजनक लेखांचें रूप घेऊन बसले आहेत! झालें आमच्या चरित्रनायकाचें किंवा काव्यार्थ प्रकाशक सूत्रधाराचें चरित्र नाटक येथें आटपलें. वामनरावजी आम्हांस सोडून गेले. परंतु, कीर्तिरूपानें महाराष्ट्रभर ते संचार करीत राहणार आहेत. वामनरावजींची जी एवढी मोठी कीर्ति झाली तीस कारण म्हटलें तर शिक्षण, ग्रंथलेखन, व काव्यार्थप्रकटीकरण, हीं जीं तीन फार महत्वाचीं, दगदगीचीं परंतु जनोपयुक्त कामें त्यांनीं हातीं घेतलीं होतीं तीं, तें निरलसपणानें व अत्यंत शहाणपणानें भारी मेहनत घेऊन करीत हें होय. जें काम हातीं धरलें तें असें तसें न करितां झीज सोडून, अगदीं मनापासून करावयाचें असा त्यांचा बाणा असे. विचारपूर्वक जें काम आपण हातीं धरलें तें शेवटास नेण्यास झटणें हेंच काय तें आपलें मोठें कर्तव्य ते मानीत. आपलें कर्तव्य हाच आपला देव, त्या देवाची मनापासून सेवा करणें हेंच धन, हेंच आपला मान, हेच आपले कायते सुखसोहाळे असेंच जणुं कायते मानीत होते, असें त्यांच्या वर्तनावरून दिसतें. कर्तव्यरूपी देवाच्या भक्तींत गढून गेल्यामुळें प्रापंचिक दुःखांचें जणुंकाय त्यांस भानच नसे. वामनरावजींच्या कर्तव्य-देवतांपैकीं कवितादेवीचा त्यांस फारच छंद लागला होता. कविताचरणसरोजमधु-प्राशनांत ते भ्रमराप्रमाणें दंग होत. वामनरावजींस भ्रमराचा दृष्टांत देणें

अयोग्य आहे कारण, भ्रमर केवळ आपण स्वतः कमलमधु प्राशन करितात, दुसऱ्यांस देत नाहींत तेव्हां, असल्या आपलपोट्या भ्रमराचा दृष्टांत दिल्यानें त्यांचा उपमर्द केल्याचें पाप लागेल. तरमग त्यांस मधुमक्षिकेचा दृष्टांत देऊं या. त्या ज्याप्रमाणें पुष्परस ग्रहण करून, त्याचा स्वादु मध बनवून, तो पोळ्यांत सांठवून ठेवितात. त्याप्रमाणें काव्यपुष्पांतील रस ग्रहण करून, त्यास आपल्या मनोहर भाषेनें अधिक गोडी आणून, तो त्यांनीं काव्यसंग्रह पुस्तकांत सांठवून ठेविला आहे. छे छे वामनरावजींस मधुमक्षिकेचा दृष्टांत दिल्यास रसिकांस राग येणार नाहीं काय? खरोखर त्यांचा त्यांस दृष्टांत शोभत नाहीं भूतलावरील ग्रहण केलेला पुष्परसमधु, कोणी घेऊं नये ह्मणून अत्यंत दुर्गम अरण्यांतील गगनचुंबित वृक्षाग्रांवरील बनविलेल्या पोळ्यांतील छिद्रांत तो गुप्त ठेवणाऱ्या अनुदार मधुमक्षिका कोणीकडे, व काव्यसंग्रहांतील उच्चतरकाव्यसुमनरसमधु ग्रहण करून, त्या संग्रह पुस्तकाच्या नीचतर भागीं ह्मणजे पायथ्याशीं, टीपारूपी पोळ्यांत अगदीं उघड्यावर पाहिजे त्यास तो घेतां यावा अशा ठिकाणीं ठेवणारे नव्हे-तो लोकांनीं घ्यावा ह्मणून त्यांचीं मनें वळविण्यास देशोदेशीं व प्रांतोप्रांतीं फिरणारे आमचे उदार चरित्र नायक कोणीकडे! वामनरावजींस आपलपोट्या किंवा अनुदार भृगमक्षिकांसारख्या कीटकांचा दृष्टांत शोभत नाहीं. भगवद्भक्तांचा दृष्टांत मात्र त्यांस साजेसा आहे. आपल्या इष्टदेवतेच्या चरणांशीं मरण यावें. असें सद्भक्त चिंतितात. पंढपुर निवासिनी विठ्ठल माउलीचीं पदकमलें पाहण्यास भाविक जसे सद्धेतूनें व ईर्षेनें जातात, त्याच सद्धेतुनें व ईर्षेनें आमचे सरित्र नायक पंढरपुरास मयूर कविकृत कवितादेवींच्या चरणग्रहणास गेले असतां, त्यांचा अंत झाला आहे. आपलें पवित्र कर्तव्य बजावीत असतां त्यांतच अंत पावणाऱ्या प्रख्यात इंग्लिश महावीर नेल्सनाप्रमाणेंच कवितासंग्रह करण्याच्या आपल्या कर्तव्यांत त्यांनीं इहलोकाचा त्याग केला आहे. ह्मणजे आपल्या इष्ट कवितादेवींच्या चरणाशींच त्यांनीं देह ठेविला आहे.

नेल्सन महावीरानें ब्रिटिशवैभव वाढण्यास तद्देशीयांस उपदेश केला आहे कीं, प्रत्येक व्यक्तीनें आपापलें कर्तव्य चोख रीतीनें बजावावें. आह्मीं आमच्या चरित्रनायकाच्या वर्तनक्रमावरून लोकांस विनंति करितों कीं, नेल्सनचा उपदेश वामनरावजींच्या वर्तनांत सफळ झाला आहे तरी, आह्मीही आपापलें कर्तव्य करण्यास झटूं या. शिक्षकांनीं शिकविण्याचें, कुलस्त्रियांनीं गृहिणींचें, वर्तमानपत्रकारांनीं राजा व प्रजा यांचा समेट करण्याचें, व प्रजेच्या हिता करितां भांडण्याचें, याप्रमाणें ज्याचें त्यानें आपापलें कर्तव्य जर नीट रीतीनें केलें, तर हिंदुस्थानच्या भाग्योदयास भरती येण्यास उशीर लागावयाचा नाहीं. वामनरावजीं प्रमाणें आमरण कर्तव्यांत गढून जाऊन तें बजावण्यांतच आपला देह ठेवणें नव्हे कर्तव्य देवतेस आपला बळी देणें हेंच देशाचें भाग्य वाढविणें होय. कर्तव्य देवतेस बळी देण्याचा प्रसंग सर्वांसच लाभेल असें नाहीं, तथापि प्रत्येक आपलें कर्तव्य यथाशक्ति करीत राहिल्यास पुरे आहे. तेव्हां विचारपूर्वक जें काम हातीं घेतलें तें मनापासून करावयाचें, हा जो आमच्या चरित्रनायकाचा विशेष स्तुत्य गुण हा, आह्मीं आपल्या आचरणांत अवश्य आणिला पाहिजे. वामनरावजींच्या चरित्रापासून शिकावयाची ही दुसरी गोष्ट होय.

ज्याचें नांव थोडेंसें गाजलें आहे, त्याच्या पश्चात् स्मारकाचा विचार निघतो. वामनरावजींच्या भक्तमंडळींत कदाचित् त्यांच्या स्मारकाचा विचार निघाला असेल, कोणी त्यांचा पुतळा उभारण्याविषयीं उद्गार काढिले असतील. ज्यांचें आपण स्मारक करूं इच्छितों, त्याचे गुण लोकांनीं आपल्या आचरणांत आणण्यास झटावें, हाच स्मारकांचा उद्देश असतो. ज्याच्या गुणरूपाची माहिती नाहीं, अशा अपरिचितानें एखाद्याचा थेट कोरविलेला पुतळा पाहिला तर, त्यावरून त्याचें नाक कसें होतें, कान कसे होते इत्यादि त्याच्या अवयवांचें त्यास ज्ञान होईल परंतु, त्याचे गुण समजण्यास, ते जाणणाऱ्याकडे गेलें पाहिजे. देहाकृति दर्शक दगडी पु-

तळ्यांपेक्षां प्रत्यक्ष गुणदर्शक पुतळेच अधिक उपयुक्त असतात. प्रत्येक चित्रकार कोणानेंही चित्र काढो, त्यांत त्याच्या स्वताच्या स्वरूपाची झांक–अत्यंत सूक्ष्म प्रमाणानें कां होईना-आलेली असते. तद्वत, मनुष्याच्या प्रत्येक कृतींत त्याच्या गुणाची छाया पडलेली असते ह्मणून, वामनरावजींच्या जर आपण कृति पाहिल्या, तर त्यांवरून त्यांचे गुण आपणास सहज कळतील. ह्मणून वामनरावजींच्या कृति हेंच त्यांचें खरें स्मारक होय. त्यांनीं स्वतः केलेल्या आपल्या स्मारकापुढें आह्मीं परकीयांनीं कितीहि चातुर्यानें केलेलीं स्मारकें तुच्छच होत. तेव्हां त्यांनीं आपलीं काय काय स्मारकें केलीं आहेत. त्यांविषयीं विचार केला पाहिजे. प्रत्येकाचें यथादर्शन चित्र हें त्याचें साधारण प्रतीचें स्मारक होय. सूर्यकरांनीं–किरणांनीं–वामनरावजींनीं आपली यथादर्शन छवि काढून ठेविली असल्यामुळें, आपलें स्वरूप पाहून त्यावरून गुणांसंबंधानें बरींच सत्य अनुमानें करणाऱ्या फ्रेनालजिष्ट किंवा कपालसामुद्रिक इत्यादिकांच्या ऋणांतून ते मुक्त झाले आहेत. शास्त्रज्ञांशिवाय अन्य जनास या स्मारकावरून त्यांच्या गुणांची चांगलीशी ओळख होणें अशक्य असल्यामुळें, हें अगदीं साधारण प्रतीचें स्मारक होय. आपल्या पितरांपासून उत्पन्न झाल्यामुळें त्यांचें झालेलें ऋण, उत्तम प्रकारची संतति उपजवून त्यांनीं फेडिलें आहे. पहिल्या प्रकारच्या स्मारकाहून हें स्मारक अधिक महत्वाचें आहे तरी, त्यावरून ह्मणजे त्यांच्या गुणाचें यथादर्शन होईलच असें नाहीं. परंतु निबंधमाला–कर्त्यांप्रमाणें आपल्या" गुणांचें खरें स्मारक लेखनरूपानें त्यांनीं जें केलें आहे, त्यावरून मात्र त्यांचे गुण स्पष्ट कळण्यासारखे आहेत विद्यादेवीच्या पुस्तकरूपी घटांतील ज्ञानामृत प्राशनामुळें ते तिचे ऋणी बनले होते, ते तिचें ऋण, तसले घट स्वतः बनवून ठेविल्यामुळें फेडिलें आहे. ज्या कवितेचे ते लालस होते, त्या कवितेस संतोषित करण्याकरितां त्यांनीं कृष्णाकुमारी, कादंबरी कथासार, वासवदत्ता कथासार, श्रीमन्माधवनिधन,

गणपतिनिधनविलाप इत्यादि मनोहर, हृदयंगम, कवित्वरसानें थबथबलेलीं अशीं काव्यें तयार करून ठेविलीं आहेत. या पंचकाव्यज्योतींनींजणुंकाय त्यांनीं कवितादेवीस पंचारती ओंवाळिली आहे. या काव्यांवरून जसा त्यांचा कवित्व गुण दिसून येतो. त्याचप्रमाणें लार्ड बेकनचें चरित्र, इंदुप्रकाशाच्या सरलार्थबोधिनी गीतेचे कित्येक अंक. लोकमान्य विविध ज्ञानविस्तार, दंभहारक अबलामित्र, सद्धर्मदीप, काव्येतिहास संग्रह व इंदुप्रकाश इत्यादि मासिकांत व वृत्तपत्रांत प्रसंगवशात त्यांणीं लिहिलेले ज्ञानपरिप्लुत, भारदस्त, पोक्त, असे निबंध, प्रख्यात निबंधमालेंतील त्यांचीं पत्रें, व काव्यसंग्रहांतील अनेक कवींच्या नानाविध काव्यांवरील टीपा, या सर्वांचें पर्यालोचन केलें असतां, पद्यप्रमाणेंच त्यांचे गद्यलेख किती उत्कृष्ट उतरले आहेत, त्यांस मराठी भाषा किती सुबोध, सरळ, व रसाळ लेखांनीं गौरवितां येत होती हें स्पष्ट कळतें. गद्यपद्य लेख लिहिण्यांत जसे ते निष्णात होते, तसेच आधुनिक कविमंडळीनें चालविलेल्या काव्यरत्नावलीच्या परीक्षक मंडळींतील ते एक उत्तम परीक्षक होते. केवळ परीक्षकच नव्हत तर, महाराष्ट्र भाषेंतील अत्यंत मार्मिक टीकाकारांतही त्यांची गणना आहे. पुस्तकांतील गुणदोष हुडकून काढण्यांत त्यांच्यासारखे प्रवीण तेच होते. निबंधमालेंतील त्यांचीं पत्रें कांहीं अंशीं टीकारूपच आहेत. त्यांवरून ते कसे टीकाकार असतील याची वाचकांस अटकळ करितां येईल. लेखनकलेंत आपली प्रगति करूं पाहणाऱ्या ग्रंथकारांनीं वामनरावजींची टीका मोठ्या उत्सुकतेनें वाचावी. ज्यांच्या ज्यांच्या ह्मणून लेखांवर त्यांनीं टीका केली त्यांचा उतावळेपणा, आत्मश्लाघा, व अहंमन्यता हीं त्यांच्या पुढील लेखांत नष्ट झालीं दिसतात. ह्मणून शिक्षकांचे ते जसे गुरु, त्याचप्रमाणें ग्रंथकारांचेही गुरु होते असें ह्मणतां येईल. वामनरावजींच्या आतांपर्यंत वर्णिलेल्या सर्व लेखांचा विचार केला असतां, त्यांनीं विद्यादेवीच्या राज्यांत अत्युच्च-विचारयुक्त-लेखरूपी आपल्या कीर्तीची ध्वजपताकाच उभारिली आहे असें वाटतें. हेंच

त्यांचें अत्युत्तम स्मारक होय. या स्मारकावरून त्यांचे अनुकरणीय गुण स्पष्ट दिसत आहेत, आतां पूर्वीं निर्दिष्ट केलेल्या मासिकांत व वृत्तपत्रांत त्यांचें जे निबंध व टीका व पत्रें जीं इतस्ततः पडलेलीं आहेत, तीं पुस्तकरूपानें एकत्र ग्रथित करणारास त्यांच्या स्मारकांस विशेष व्यवस्थित रूप दिल्याचें पुण्य—लागणार आहे,त्या पुण्याचा धनी कोण होतो,तें पहावें, आह्मां महाराष्ट्रियांत आङ्ग्लभौमाच्या मानानें विद्वान कमी, त्यांत जे थोडे बहुत आहे त्यांचा बहुतेक वेळ ख्यालीखुशालींत, थट्टामस्करींत, हंसण्याखेळण्यांत जातो हें आमच्या देशाचें दुर्दैव होय. विद्वान आपलें कर्तव्य बजावीत नाहींत ह्मणूनच दुर्दैवाची वाढ होत आहे. आमचे कित्येक विद्वान उत्तम वक्ते आहेत, कित्येकांचे विचार इतके गंभीर आहेत कीं, ते पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास लोकांचें फारच कल्याण होण्याजोगें आहे. परंतु त्यांच्या व्याख्यानास किंवा विचारांस लेखांचें रूप द्यावयास त्यांस सवड नसल्यामुळें ‘ उत्पद्यंते विलीयंते ’ या मार्गाकडे त्यांची धाव चालली आहे. या विद्वानाच्या हयातींत किंवा फार झाल्यास पुढल्या एकदोन पिढ्यांतच त्यांचें नांव गाजावयाचें परंतु, त्या पुढील पिढ्यांत हे विद्वान नामशेषच रहावयाचे कीं नव्हे. प्रस्तुत विद्वान कदाचित् ह्मणतील कीं, आम्हांस कीर्तीची जरूर नाहीं, मग आम्हीं काय म्हणून ग्रंथलेखनाची यातायात करावी ! यास उत्तर असें कीं, कीर्तीची जरूर नसल्यास ग्रंथ लिहिणें ही खुशीची गोष्ट खरी परंतु, दुसऱ्याचें घेतलेलें ऋण फेडणें न्याय्य नव्हे काय ? रस्त्यावरील अर्धीदुगाणी धर्म केलेल्या भिकाऱ्यापासून मोबदला मिळण्याची कोणी इच्छा करीत नाहीं तद्वत, प्राथमिक शिक्षणाचेंच ज्यांस दान दिलें, अशांपासून विद्यादेवी मोबदला मिळवूं इच्छित नाहीं, परंतु हजारों हजार रुपये ज्यांस सत्कृत्यें करण्यास दिले आहेत, त्यांपासून महत्वाचें काम करून घेण्यास दाता इच्छितो. विद्यादेवीनें आपणास उदार शिक्षण दिलें आहे, तिचें तंतोतंत ऋण फेडण्यास कोणीच समर्थ नाहीं. परंतु फूल नाहीं फुलाची पाकळी तिची फेड केली पाहिजे. नेत्रांनीं

तिच्या जितक्या ग्रंथांचें आपण ज्ञान ग्रहण केलें आहे, तितकीं पानें हा-तानें लिहून ग्रंथसंग्रहांत भर घालाल तरी तिचे थोडेबहुत उतराई झाल्याचें आपणास श्रेय लागेल. असो वामनरावजींनीं विद्यादेवीचें ऋण यथाशक्ति फेडिलें आहे. त्यांचें अनुकरण प्रत्येकानें करणें इष्ट आहे. वामनरावजींच्या चरित्रापासून महत्वाची शिकण्यासारखी ही तिसरी गोष्ट आहे.

वामनरावजी स्वभावानें फार गरीब होते, तरी त्यांचा विद्याव्यासंग फार दांडगा होता. ते अगदीं शांत दिसत, तरी आपलीं कर्तव्यें करण्यांत ते फार आवेशी होते. ते मोठे मनमिळाऊ होते, तरी आपलें स्वतःचें काम करून घेण्याकरितां त्यांनीं कोणाची हांजीहांजी केली नाहीं, किंवा कोणाची मर्जी संपादून घेण्याकरितां व्यर्थ स्तुति किंवा तोंडपुजेपणा कधीं केला नाहीं. ते फारच सोशीक होते, तरी परदुःख व अन्यायीवर्तन त्यांस कधीं सहन होत नसे. त्यांचा प्रतिकार करण्यास ते यथाशक्ति मनापासून झटत. ते अगदीं निरभिमानी होते, तरी महाराष्ट्र कवींचा, व त्यांच्या काव्यांचा, व आपल्या देशाचा त्यांस मोठा अभिमान असे. ते अगदीं साधे होते, तरी काव्यमर्म जाणण्यांत ते मोठे रसिक होते. ते अगदीं भोळे असावे असें वाटे, परंतु लेखनरूपी वाद-विवादांत ते अत्यंत धूर्त व लाघवी होते. ते अगदीं निर्व्यसनी होते, तरी विद्याव्यसनांत ते अगदीं चूर होऊन गेलेले होते. विद्याव्यसनानें त्यांचें मन फारच सुसंस्कृत झालें होतें. पैसा मिळविण्याकरितांच केवळ ते विद्या शिकले नव्हते, तर ज्ञानार्जनाकरितां त्यांचा सतत विद्याव्यासंग चालला होता. आपल्या श्रमाचा पैशाच्या रूपानें योग्य मोबदला घेईन, तेव्हांच काम करीन असा त्यांचा बाणा नसे. काव्यसंग्रहाचें काम करण्यास त्यांस जो मुशाहिरा मिळे, तो श्रमाच्या मानानें इतका थोडा असे कीं, त्याचा उल्लेख करण्यास आह्मांस संकोच वाटतो. इतक्या अल्प-प्राप्तीचें काम एवढ्या मोठ्या विद्वानानें कसें हातीं धरिलें असेल, अशी पृच्छा करणारे बहुत लोक असतील, त्यांस उत्तर असें कीं, "काव्यसं-

ग्रह चालविण्यांत लोकहित आहे, लोकहित करण्यांत मोबदल्याकडे पहावयाचें नाहीं. प्राप्तिच्या मानानें अधिक होणाऱ्या श्रमाची, आपल्या आवडीच्या विषयांत खपल्यामुळें होणाऱ्या आनंदानें भरपाई करावयाची, असा त्यांनीं निश्चय केला असावा ह्मणूनच, काव्यसंग्रहाचें मोठ्या यातायातीचें काम, थोड्या मुशाहिऱ्यांतही त्यांनीं फार झटून केलें असावें वामनरावजींची ही गोष्ट, कशीबशी ग्रंथरचना करून शेंकड्यांचे शेंकडे पारितोषिकें मिळविणाऱ्या ग्रंथकारांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. वामनरावजींची एवढी मोठी योग्यता असतां, त्यांस आपण कोणी मोठे मनुष्य आहों असा गर्व नसे. उघडच आहे कीं, भरगच्च भरलेलीं कणसें धान्यभारानें जशीं लवून जातात तद्वत्, अत्यंत गंभीर व उन्नत विचार ज्यांच्या डोक्यांत नेहमीं राहिले होते त्यांस नम्रता व विनयधारण करणें अगदीं साहजिकच झालें होतें. त्यांचें वर्तन अगदीं साधुप्रमाणें असे. संबळपुरास तर त्यांस धर्मराज हें नांव पडलें होतें. तेव्हां साधें रहाणें व गंभीर विचार करणें, हा जो आमच्या चरित्र नायकाचा उत्कृष्ट गुण, तो लोकांनीं आपल्या आचरणांत आणण्यास झटावें. वामनरावजींच्या चरित्रापासून शिकण्यासारखी ही चवथी गोष्ट होय.

वामनरावजींचे अनुकरण करण्यास योग्य अशा आतांपर्यंत वर्णिलेल्या गुणांप्रमाणें बहुत गुण आहेत. त्या सर्वांचें वर्णन करण्यास स्वतंत्र ग्रंथ लिहिला पाहिजे. तसें करण्यास सवड नाहीं ह्मणून, या सर्व गुणांचा पायाच जणुंकाय असा एक गुण सांगतों. दृढनिश्चयानें सतत उद्योग करणें हाच तो त्यांचा गुण होय. या गुणाच्या जोरावरच त्यांच्या सर्व सुष्टगुणांचा उदय झाला. 'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत्' या सुभाषितांतर्गत उपदेशान्वयें, त्यांनीं जडधन नव्हे, परंतु त्याहून अत्यंत महत्वाचें विद्याधन संपादन केलें मृत्यूनें आपली शेंडी धरिली आहे व क्षणांत तो आपणास घेऊन जाईल, असें समजून धर्माचरण करावें, व आपण अमर आहों असें मानून विद्यार्जन करावें, असें महात्मे सांगत आले.

विद्यार्जन करण्यांत वामनरावजी आपणास अमर समजत होते म्हणूनच, त्यांच्या कृतींचा लोकांस फार उपयोग झाला. व तो पुढेंही होईल. 'विद्याव्यसनं व्यसनं अथवा हरिपाद सेवनं व्यसनं' असे महाजन वाक्य आहे. आमचे वामनरावजी भक्तिभावानें विद्येचें सेवन करीत होते म्हणूनच त्यांचें महत्व फार वाढलें आहे. दृढनिश्चयानें सतत उद्योग करून आपले उपयुक्त गुण वाढवून त्यांनीं आपणास धन्य म्हणवून घेतलें, त्या त्यांच्या दृढाभ्यास गुणाचें अनुकरण करण्यास आपण झटावें. वामनरावजींच्या चरित्रांतील शिकण्यासारखी ही पांचवी गोष्ट होय.

आमच्या चरित्रनायकाच्या वर्तनक्रमाचें सारच अशा या पांच गोष्टींचें लोकांनीं जिवेंभावें अनुकरण करावें. या पांच गोष्टी जणुंकाय त्यांचे पंचप्राण होते म्हणून, या पांच गोष्टी जेथें आढळतील, तेथेंच वामनरावजींचें खरें स्मारक होईल. या पांच गोष्टींनीं युक्त अशी एखादी व्यक्ति आढळल्यास, तींत वामनरावजींच्या आत्म्यानें प्रवेश केला आहे, व ती व्यक्ति वामनरावजींचा अवतार होय, असें समजावें.

येथपर्यंत चरित्रनायकाच्या गुणांचेंच कायतें प्रदर्शन झालें. गुणाप्रमाणें त्यांचे दोष दाखविल्याखेरीज त्यांचें चरित्र सत्यज्ञांस पसंत पडावयाचें नाहीं. 'या जगांत गुणरहित जसा कोणी नाहीं, त्याचप्रमाणें दोषरहित ही कोणीच नाहीं.' ही कविकुलगुरु कालिदासोक्ति सत्य आहे. तीस अनुसरून वामनरावजींचे कांहीं दोष दाखविले पाहिजेत. 'Paint me as I am' या एका महात्म्याच्या आज्ञेंत, त्यानें आपले दोष दर्शविण्यास सुचविलें आहे. तद्वत उदारचरित्र आमचे वामनरावजी स्वर्गांतून उद्गार काढीत असतील असें वाटतें. पण काय करावें हो! त्यांचे दोष शोधून काढण्यांत आह्मी हतवीर्य झालों आहों. सहस्त्ररश्मी सूर्यनारायण आपल्या धवलप्रकाशानें अखिल जगावर आपली प्रभा पसरितो, त्यावर काळेकुट्ट डाग आहेत अशी माहिती शास्त्रज्ञांनीं दुर्बिनीच्या साह्यानें काढिली आहे. आतां नुसत्या डोळ्यांनीं पाहणारास भग-

वान सूर्यनारायणाचे डाग, त्याच्या प्रकाशवैपुल्यामुळें दिसत नाहींत. त्याचप्रमाणें. आमच्या चरित्रनायकाच्या गुणवैपुल्यांत त्याचे दोष आह्मांस कोठें दिसत नाहीत. आतां शास्त्रज्ञ ह्मणतील कीं, पृथ्वीपासून सहस्त्रावधि योजनें दूर असणाऱ्या सूर्याचे प्रखर तेजांत जर आह्मी त्यावरील डाग दुर्बिनीनें पाहिले आहेत, तर मुंबईस राहणारा जो तूं, त्या तुला मुंबईहून फार दूर नाहीं अशा नागपुरस्थ तुझ्या चरित्रनायकाचे दोष पाहतां आले नाहींत काय? शास्त्रज्ञांस माझी अशी विनंति आहे कीं, सूर्यावरील डाग दाखविणाऱ्या दुर्बिनीला चरित्रनायकाचे दोष दाखवितां येणें अशक्य आहे. ते हयात असतां त्यांस येथून जरी दुर्बिनीनें पाहतां आलें असतें असें मानिलें, तरी फार झाल्यास त्यांच्या दैहिक दोषांचेंच कायतें ज्ञान झालें असतें. त्या दोषग्रहणाचें फारसें महत्व नाहीं गुणांचे प्रतिरोधी जे दोष त्यांचें ज्ञान असल्या दुर्बिनीनें कधींच व्हावयाचें नाहीं. आतां त्यांच्या गुणांत कांहीं दोष असलेच पाहिजेत. ते असले तरी फारसे असतीलसें वाटत नाहीं, एखाद दुसराच दोष असेल. व तो 'एकोहि दोषो गुणसंनिपाते निमज्जतींऽदोःकिरणेष्विवांकः' या न्यायानें लुप्तही होईल तथापि, दोषाविष्करणाखेरीज चरित्र पूर्ण होत नाहीं ह्मणून. विद्वान जान्सन याचा बास्वेल नांवच्या निःसीम भक्तानें जान्सच्या चरित्रांत त्याचे दोषही वर्णिले असल्यामुळें, त्याचें चरित्र सत्यज्ञान जिज्ञासूंस विशेष प्रिय झालें आहे. ह्मणून, त्याचें अनुकरण करण्याकरितां, आतां आह्मी आमचा चरित्रनायक जरी या लोकीं नाहीं तरी, त्याचें चरित्र आमच्या टेबलावर आमच्याच लेखणींतून बाहेर पडत आहे, तें अगदीं वितीच्याच अंतरावर आहे तरी, त्यांतील दोष जड दृष्टीनें दिसावयाचे नाहींत, ह्मणून अत्यंत सूक्ष्म विचार दृष्टीनें पाहूं या. या सूक्ष्मविचारदृष्टीरूपी दुर्बिनींतून कित्येक दोष दिसत आहेत खरे! अरेरे चौर्यकर्म हा मोठा दोष नव्हे काय? आमचे वामनरावजी आपल्या अल्लड व अज्ञान शिष्यांचीं मनें पहा कशीं चोरून घेत आहेत. य

चौर्यकर्माशिवाय भला थोरला मोठा एक दोष त्यांत दिसत आहे. अहो व्यसनें ह्मटलीं म्हणजे येथून तेथून सगळीं नादान व घातकच नव्हत काय ? आमचे चरित्रनायक विद्याव्यसनांत अगदीं दंग होऊन गेल्ले दिसतात. हे त्यांचे फारच मोठे दोष आपणास दिसले. त्यांखेरीज त्यांसारखेच ल्हानसहान कितीतरी दोष, त्यांच्या स्वीकारणीय म्हटले-ल्या नुकत्याच वर्णिलेल्या पांचव्या गोष्टींत दिसत आहेत. आतां, वामन-रावजींचे दोष दाखविल्यामुळें, आम्ही पक्षपातित्वाच्या दोषांतून अगदीं मुक्त झालों आहों. हे वामनरावजींचे दोष दाखविले खरे, परंतु हें दोष असे आहेत कीं, असल्या दोषांनीं युक्त असेच पुष्कळ लोक व्हावयास पाहिजे आहेत. असले दोष करणारांचीच आमच्या देशांत मोठी उणीव आहे. आम्ही आमच्या वाचकांस पूर्वीं वामनरावजींच्या वर्णिलेल्या गुणांचें अनुकरण करण्यास सांगितलें होतें, आतां त्यांस अशी विनंति करितों कीं, त्यांच्या गुणांपेक्षां आतां वर्णिलेल्या त्यांच्या दोषांचेंच विशेष आस्थेनें अनुकरण करा. हें आमचें वर्णन पाहून शास्त्रज्ञ आह्मांस दरडावून सांगतील कीं, असलें अलंकारिक वर्णन आह्मांस नको आहे. त्यांचे खरे खरे दोष दाखवा. आतां तसले खरे दोष दाखविण्यास आह्मीं असमर्थ असल्यामुळें, आह्मीं लिहित असलेलें चरित्र अपूर्ण आहे असें त्यांनीं ह्मटल्यास पुरवलें. तथापि, वामनरावजींच्या चरित्रांत त्यांचे उत्तम गुण प्रदर्शित करण्याचा जो यत्न केला आहे त्यांत, आमच्या प्रमादामुळें कितीतरी दोष झाले आहेत. अर्थात्, त्यांच्या चरित्रांत त्यांच्या उत्कृष्ट गुणांप्रमाणें मोठमोठे दोषही आहेत, असें समजून पाहिजे असल्यास आपल्या मनाचें त्यांनीं समाधान करून घ्यावें. या खेरीज अन्यमार्ग दिसत नाहीं.

आह्मीं आपल्या सामर्थ्यानुरूप रसिकवर वामनरावजी ओक यांचें गद्य-काव्यात्मक अल्प चरित्र लिहिलें आहे, यांत पुष्कळ दोष झाले असतील; त्यांचीं

सुज्ञांनीं क्षमा करावी, व ते दोष मला दाखवावे ह्मणजे दुसऱ्या आवृत्तीचा प्रसंग आल्यास त्यांस फांटा देतां येईल. आमच्या चरित्रलेखन पद्धतीवर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप निघतील. त्यांतील ठळक ठळक दोन तीन भावी आक्षेपांचा येथें विचार करूं.

या चरित्रावर पहिला मोठा असा आक्षेप निघण्याचा संभव आहे कीं, "चरित्रनायकास आह्मी नसतें महत्व दिलें आहे. ह्मणजे देवादिकांचे जे त्यांस आह्मीं दृष्टांत दिले ते तर फारच झाले परंतु, बेकन, नेल्सन, किंवा जान्सन, यांच्या पंक्तींत वामन बसणें योग्य नव्हे" या आक्षेपास उत्तर असें आहे कीं, वामनरावजीं प्रमाणें काव्यांचें मर्म जाणणारे, व त्यांचा लोकांस लाभ करून देणारे गृहस्थ आह्मांत कोणी फारसे आढळत नाहींत. आरोग्य नष्ट झाल्यावर त्याचें महत्व कळतें त्याप्रमाणें, वामनरावजींच्या पश्चात् त्यांचें महत्व लोकांस कळूं लागलें आहे. हा लोक सोडून त्यांस ४ महिने होत आले, तरी त्यांची जागा भरून काढण्यास कोणी मिळत नाहीं. 'बहुरत्ना वसुंधरा' या ह्मणी प्रमाणें त्यांहून अधिक योग्यतेचे कोणी गृहस्थ असतील. पण त्यांचा अद्याप कोठें पत्ता नाहीं. आतां काव्यसंग्रहाचें काम त्यांहून उत्तम रीतीनें करणारे कोणी निघाले तरी, त्यांच्या श्रेष्ठपणास बाध येतो असें नाहीं. देवादिकांत तरी सगळेच सारख्या योग्यतेचे आहेत असें नाहीं. इंग्रेजी भाषेंतील मोठमोठ्या विद्वान व कवीं प्रमाणें प्रस्तुत महाराष्ट्र भाषेंत विद्वान व कवि आढळतीलच असें नाहीं. ह्मणून, त्यांचें माप आमच्या कांहीं उपयोगीं पडावयाचें नाहीं ह्मणून, आह्मांत हल्लीं ज्यांची विद्वत्तेसंबंधें किंवा कवित्वासंबंधें ख्याति आहे त्यांचें गौरव करणें हेंच आह्मांस इष्ट आहे.

वामनरावजींस नसतें महत्व देऊन, ह्मणजे त्यांची व्यर्थ स्तुति करून त्यापासून आमचें स्वताचेंच कायतें हित करून घ्यावयाचें आहे असें नाहीं तर, त्यांच्या खऱ्या गुणाची चूज करून त्यांसारखे लेखक उत्पन्न

व्हावे, व त्यांनीं वामनरावजींहून अधिक चांगलें काम करण्याचा प्रयत्न करून, राष्ट्रहित संपादन करण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति करावी, व ती पासून बहुतांचें हित व्हावें हा उद्देश आहे. एखाद्या साधारण प्रतीच्या हरिदासानें किंवा पुराणिकानें ईश्वरभक्तीकडे लोकांचें मन वळविण्याचा बहाणा केल्यासही, लोक त्याच्या भजनीं लागून त्यास प्रति ईश्वर मानितात, तर मग ज्यानें खरच कवितादेवीच्या भजनीं बऱ्याच लोकांस लाविलें आहे, त्या वामनरावजींचें देव्हारें करण्यांत मोठें पाप आहे असें आम्हांस वाटत नाहीं. त्याचें गौरव करण्यांत 'परगुण परमाणुं पर्वतीकृत्य नित्यं' किंवा 'अन्याची स्तुति करुनी साधु निज-स्तुति करूनि घेतात' या साधूंच्या व्रताचें आम्हीं अवलंबन केलें आहे असें नाहीं, तर त्यांचें महत्व प्रगट करण्याचा उद्देश, त्यां सारखे पुष्कळ लोक तयार व्हावे हाच आहे.

या चरित्र लेखनावर दुसरा असा आक्षेप येण्यासारखा आहे कीं, 'याची भाषा अत्यंत अलंकारिक आहे. अलंकारांची यांत इतकी गर्दी उसळली आहे कीं, त्यां खालीं चरित्रनायक अगदीं झांकून गेले आहेत! त्यामुळें अत्यंत सुलभ विषय फारच दुर्बोध झाला आहे. एखाद्या लहान लेंकरावर त्यास न पेलतसे अलंकार घातल्यानें, त्याची चालतांना जशी तिरपिट उडून जाते व, तें मूल विशोभित दिसतें तोच प्रकार प्रस्तुत चरित्र वाचतांना होतो. हें चरित्र अलंकारिक भाषेनें न लिहितां अगदीं साध्या भाषेनें लिहितां आलें नसतें काय?' इत्यादि आक्षेपांस उत्तर असें कीं,— प्रस्तुत चरित्र अलंकारिक भाषेनेंच लिहिण्यांत लेखकाचे पुष्कळ उद्देश आहेत. पहिला उद्देश असा कीं, त्याच्या लेखणीस, केंस, वस्त्रें अशांसारख्या केवळ शास्त्रीय अर्थात् शुष्क वाटणारे विषय लिहिण्यांत जो शीण आला होता, तो शीण तिला अलंकारिक भाषेंत खेळवून नाहींसा करावयाचा होता. दुसरा उद्देश असा कीं, शास्त्रीय विषयांसारख्या बहुजनांस अप्रिय अशा विषयांत राबलेली लेखणी, काव्यासारख्या नाजूक विषयांत कसा

काय काम करिते, हें तिच्या अभ्यास पहावयाचें होतें. तिसरा उद्देश असा होता कीं, लष्करी अमलदाराची छवि त्याच्या लष्करी पोषाखांनीं व अलंकारांनीं फार खुलते तद्वत, कविताराज्ञीच्या सैनिकाची चरित्ररूप छवि, काव्यालंकारांनीं युक्त अशी काढणें विशेष प्रशस्त वाटलें. आतां त्यांजवर घातलेले अलंकार पेलत नाहींत अशी कोणाची तक्रार असल्यास ती व्यर्थ आहे. कारण, मयूरपंडितांसारख्यांनीं कवितादेवतेस सोन्यारत्नाचे अत्यंत जड अलंकार घडलेले ज्या वामनरावजींनीं सतत आपल्या हृदयांत वागविले,त्यांस मजसारख्या कृपण व दीन मनुष्यानें घातलेले थोडेसे पितळी हलके दागीने फार जड वाटतील, हें ह्मणणें अगदीं मिथ्या आहे. आतां 'अलंकारांनीं चरित्रनायकास अगदीं झांकून टाकिलें आहे'! बरें तसें झालें ह्मणून काय झालें? आपल्या प्रिय देवतेवर सद्भक्तानें फुलांचीं रास करून ठेविल्यामुळें, ती देवता लोपून गेली ह्मणून, त्या भक्तावर रुसवा करणाऱ्यास भाविकजन काय ह्मणतील बरें! आतां अलंकारिक भाषेमुळें विषय बोजड झाला आहे, असें ह्मणणारांनीं प्रख्यात संस्कृत गद्यकवि बाण, याच्या कादंबरीसहि तोच दोष दिला पाहिजे. कादंबरी वाचीत असतां मुख्य विषय सुटून अगदीं अरण्यांत पडल्यासारखें वाटतें ह्मणून, बाणकवीस कोणी दोष देत नाहीं, तर त्याची अपूर्व कल्पनाशक्ति पाहून ते अगदीं मोहून जातात. तसा प्रकार जरी या चरित्राचा झाला नाहीं तरी, हें अगदींच टाकाऊ नाहीं. अलंकारिक भाषेनें चरित्र लिहिल्यामुळें तें ज्यांस दुर्बोध वाटत असेल, त्यांचा व अलंकारिक काव्यांचा उभा दावा असला पाहिजे. त्यांनीं या चरित्राच्या वाटेस न जावें हें बरें. अगदीं साध्या भाषेनें हें चरित्र लिहितां आलें नसतें काय? अशी पृच्छा करणारांस आह्मीं असें पुसतों कीं, सणावारीं देखील रेशमी किंवा जरीचीं वस्त्रें न नेसतां नेहमींचीं साधीं वस्त्रेंच वापरतां येतील किंवा नाहीं? वामनरावजींसारख्या महात्म्याच्या चरित्राचा ऊहापोह करणें याहून अधिक मोठा सण तो कोणता? सणाप्रमाणें वामनरावजींचें चरित्रवाचन

ज्यांस प्रिय असेल, त्यांकरितांच आमचा हा प्रयत्न आहे. अहो अगदीं साधी भाषा, अगदीं साधी भाषा, ह्मणून ह्मणतात तींत तरी अलंकार नसतात काय? कितीही साधें वस्त्र असलें तरी त्यांत उपयुक्तपणाखेरीज कांहीं तरी विलासाचा व शोभेचा ह्मणून भाग असतोच. तद्वत, अगदीं साध्या भाषेंतही अलंकार असतातच. 'मी हें काम क्षणांत करून टाकीन' हें अगदीं साध्या भाषेंतलें अगदीं साधें वाक्य आहे, परंतु हें उच्चारण्यासच क्षणाहून अधिक वेळ लागला आहे. मग काम करून टाकण्यास कितीतरी वेळ लागेल हें उघड आहे ह्मणून, या वाक्यांत अतिशयोक्ति अलंकार आहे. याप्रमाणें 'तो वाघ आहे, 'ती रंभा आहे, इत्यादि अगदीं साध्या भाषणांत चेंपून अलंकार भरलेले आहेत. परंतु, ते नेहमींच्या घसणींतले असल्यामुळें, त्यांचें कांहीं वाटत नाहीं. काव्यांतले अलंकार परिचयांतले नसल्यास त्यांची भीति वाटते. परंतु, जसजसा त्यांचा परिचय होत जातो, तसतशी ती भीति नष्ट होते. 'पुराणप्रकाशक' व 'मूरकरादि' मंडळ्या, कवितांतर्गत पुराणें अगदीं साध्या गोष्टींच्यारूपानें प्रसिद्ध करीत आहेत, ह्मणून कवितेचा कारभार आतां अगदीं आटपला असें कोणी समजूं नये. साध्या गोष्टी मोठ्या प्रेमानें वाचणारे जसे लोक आहेत, तसेच कवितेचे व अलंकारिक वर्णनाचे शोकीही पुष्कळ लोक आहेत. जलग्रामस्थ फडणिसांच्या काव्यरत्नावलींत कित्येक आधुनिक कवि अगदीं साध्या गोष्टींचीं अलंकारांनीं भरलेलीं पद्यमय काव्यें प्रकाशित करीत आहेत, तीं लोकांस आवडत आहेत. तद्वत, आमचें हें अलंकारिक चरित्र लोकांस आवडेल असें वाटतें. अलंकारिक भाषेनेंच हें चरित्र लिहिण्याचा आणखी एक उद्देश होता कीं, लोकांस अगदीं क्षुल्लक वाटणाऱ्या परंतु उपयुक्त विषयांस महत्व आणण्याचा प्रयत्न करावयाचा. हक्स्ले, टिंडाळ, रालेंड अशांसारख्या शास्त्रज्ञांनीं खडू व केंस असल्या अत्यंत क्षुल्लक व रूक्ष वाटणाऱ्या विषयांवर गंभीर ग्रंथरचना करून, या विषयांचें महत्व लो-

कांच्या ध्यानीं आणून दिलें आहे. प्रख्यात पोप कवीनें तर निरस, मलिन, कुटिल, व जड केंसावर 'The Rape of the Lock' या नांवाचें जगत्प्रसिद्ध काव्य रचिलें आहे. राजेरजवाड्यांचेंच काय तें इतिहासांत वर्णन यावयाचें हा पूर्वींचा ग्रह आतां मावळून सामान्य गोष्टींसही इतिहासांत महत्व आलें आहे. पाश्चात्य देशांत न्हाव्याधोब्यांचींही चरित्रें, मोठ्या गंभीर व रसाळ भाषेंत होऊं लागलीं आहेत. या सर्व गोष्टींत जर कांहीं अर्थ असेल, तर आमच्या कृतीस कोणीहिं नांवें ठेवणार नाहीं. प्रस्तुत चरित्रावर आणखीं असा आक्षेप घेण्यांत येईल कीं, थोड्या अक्षरांत पुष्कळ अर्थ आणावयाचा तें सोडून, पुष्कळ मोठमोठ्या वाक्यांत खरें चरित्र फारच थोडें आणिलें आहे. गोष्ट खरी आहे. भगवान पाणिनीनें व्याकरणशास्त्राचीं, अल्पाक्षरांत बहुअर्थ दाखविणारीं सूत्रें रचिलीं आहेत. त्यांची योग्यता व्याकरणाभ्यासी जितकी मानितात, तितकीच काव्याचा अभ्यास करणारे लोक बाणकवीच्या खुलवून वर्णिलेल्या कादंबरी ग्रंथाची मानितात. कारण, या गद्यकाव्यांत कल्पनाविकासकुतूहल कांहीं अप्रतिम आहे. केवळ साधीं चरित्रेंच उपयोगाचीं, त्यांत अलंकार कांहीं कामाचे नाहींत, असें समजणारे, लांकूडफांट्याकरितां वृक्षाची योग्यता जाणतात परंतु, त्यावरील फुलें शोभेचाच केवळ भाग ह्मणून त्यांची हेळसांड करितात असें होतें. परंतु, त्या पुष्पांतूनच तसले वृक्ष निर्माण व्हावयाचे आहेत या गोष्टीचा त्यांनीं विचार करावा. ग्रंथकार-पित्यानें आपल्या भाषाकन्यकेस नेहमीं उपयुक्त परंतु कंटाळवाणीं कामें करावयास न लावितां, कधींमधीं तिला सुंदर दागिने व पोषाख लेववून, तिच्या खेळांचें कौतुक पाहण्यांत कांहीं वेळ दवडिला पाहिजे. शास्त्रीय विषय मूळचेच कठिण असतात, त्यांची भाषा साधी बरी. परंतु, चरित्रांसारखे सहज समजावयाजोगे विषय जरा गौरविले ह्मणून, ते समजण्यास प्रयास फार पडतात असे कांहीं नाहीं, तर उलट ते अधिक प्रियच होतात. कारण ज्या गोष्टींचा आपणांस अगदीं सहज लाभ होतो, त्या गोष्टींचें महत्व वाटत

नाहीं. थोड्याशा प्रयत्नानें संपादिलेल्याच गोष्टीपासून आनंद होतो. फार प्रयत्न करावे लागल्यास मात्र लोक त्या गोष्टीचा नाद सोडून देतात. हा नियम भाषेसही लागू आहे. प्रस्तुत चरित्र थोड्याशा प्रयत्नानें समजण्यासारखें आहे. प्रस्तुत चरित्रलेखनपद्धति लोकांस अपूर्व वाटेल, असें भासल्यामुळें इतका विस्तार करावा लागला, त्याची सुज्ञांनीं क्षमा करावी. वामनरावांच्या संबंधानें जी माहिती मिळाली, तिच्या आधारानें हें अलंकारिक वर्णन लिहिलें आहे. इंग्रजींत कित्येक फार उपयुक्त चरित्रें लिहिलेलीं आहेत, त्यां सारखें वामनरावजींचें चरित्र लिहितां येण्यास, वामनरावजींवर आलेले कठीण प्रसंग, त्यांतून त्यांनीं शहाणपणानें आपली करून घेतलेली सुटका, त्यांच्या संबंधानें बोधपर व चमत्कारिक आख्यायिका, त्यांच्या गद्य व पद्य ग्रंथांतील उत्कृष्ट उतारे, व त्यांवरून त्यांच्या लेखनकलेचें परीक्षण, त्यांचा स्वभाव व त्यांचीं मतें, या, व याच सारख्या दुसऱ्या बहुत उपयुक्त गोष्टींचा विचार व्हावयास पाहिजे होता परंतु, माहितीच्या अभावामुळें तसें कांहीं करितां आलें नाहीं. ही महत्वाची माहिती मिळवून त्यांचें उपयुक्त चरित्र कोणी लिहीपर्यंत प्रस्तुत चरित्राचा लोकांस थोडा बहुत उपयोग होईल असें वाटतें.

मजसारख्या अल्पज्ञानें वामनरावजींचें चरित्र जर इतपत लिहिलें आहे, तर मजहून अधिक योग्यतेच्या मार्मिक विद्वानास तें किती उत्तम लिहितां येईल, याची अटकळ प्रस्तुत चरित्रावरून वाचक सहज करतील. ही कांहीं लहानसान गोष्ट नव्हे. यथाशक्ति दोन तीन भावी आक्षेपांचें समर्थन केलें आहे. यापुढें जसजसे आक्षेप येत जातील, तसतसें त्यांचें समर्थन करणें योग्य असल्यास तें करण्याचा यत्न करीन. या चरित्रांत जर कांहीं चांगुलपणाचा भाग असेल, तर तो चरित्र नायकाच्या उत्कृष्ट गुणामुळेंच झाला आहे असें समजावें. हें चरित्र अगदींच टाकाऊ व भिकार वाटल्यास, मजसारख्या अविद्वानाकडून तें तसेंच उतरावयाचें

असें समजून स्वस्थ असावें. शेवटीं 'वेडें वाकुडें लिहीन । भाग्य तुझें मी वर्णीन' अशी आमच्या चरित्रनायकाची प्रार्थना करून, त्यांचें अनुकरण करण्यास वाचकांस पुनः पुनः विनंति करितों. वामनरावजींचें कसेंतसें तरी जीवनचरित माझ्या हातून प्रसिद्धीस आलें, याचा अत्यंत हर्ष वाटतो. वामनरावजींस अत्यंत आवडतीं जीं महाराष्ट्र काव्यें, काव्यसंग्रहांत प्रसिद्ध होतात त्या काव्यसंग्रहांतच, त्यांस कांहीं दिवसांपूर्वीं लघु चरित्र रूपानें ठेवण्याचा मला प्रसंग मिळाला होता. आतां तर हें त्यांचें गद्यकाव्यात्मक चरित्र स्वतंत्रच लिहिलें आहे म्हणून, माझा आनंद द्विगुणित झाला आहे. या आनंदांत हर्षविवश झाल्यामुळें, उदारचरित, चरित्र नायकाच्या मंगल-चरित्र लेखनांत शिणलेल्या लेखणीस, विश्रांतिस्तव मोठ्या उल्हासानें रजा देतों.

# आर्या.

श्रीमन्मयुरकविचें हृदय असे काव्यसंग्रहीं गुप्त ॥
तें व्यक्त करुनि दावी सकलहि दुर्बोधता करुनि लुप्त ॥ १ ॥

कवितालंकारांतच गुंतुनि जो राहिला तिचा अर्थ ॥
व्यवहार बंद पडतां मोडी नग ते करूनियां व्यर्थ ॥ २ ॥

बहुमोल दागिन्यांचीं अत्यल्प करूनियां बहुत शकलें ॥
सामान्य जना वांटी अर्थग्रहणास ते तरिच शकले ॥ ३ ॥

किंवा काव्यफलामृत अज्ञजनें-शिशूंस सहज चाखाया ॥
टीपारूपें देई †त्याच्या फांका चिरूनियां खाया ॥ ४ ॥

अल्पाक्षरांत आणी बह्वर्थ जनास समजण्या नीट ॥
बह्वर्थानें दावी सूक्ष्मार्थ ह्मणूनियां नये वीट ॥ ५ ॥

विस्तृत समर्पक असे ग्रंथांतरिंचे बहुत आधार ॥
दावी बहुश्रुतपणा प्रकट करी रसिकता जनीं फार ॥ ६ ॥

ह्मणती मयूरकविता पाहुनि सुरगुरुहि मान वांकविता ॥
तो श्रीमयूरकवि या वामन-टीपांस हृदय कांपवितो ! ॥ ७ ॥

---

१ काव्यसंग्रह मासिक पुस्तकांत. २ उघड. ३ नाहींशी. ४ कवितेचे शब्दालंकार १०, पक्षीं दागदागीने. ५ स्पष्टीकरण, पक्षीं पैसा. लोकांनीं दागिन्यांत जसा पैसा अडकवून टाकिला आहे, तसा कवितेचा स्पष्टार्थ किंवा तिचा पैसा तिच्या अलंकारांत गुंतलेला आहे असा भाव. ६ दागिन्यांत पैसे गुंतल्यामुळें व्यापारास जशी अडचण पडते, तद्वत् अलंकारांमुळें कवितेचा स्पष्टार्थ समजण्यास पंचाईत पडते असा भाव. ७ वटावून देई. ८ कमाल. ९ कवितेच्या अलंकारांचीं. १० अति लहान. ११ तुकडे. १२ अर्थ समजण्यास. १३ काव्यरूपी फळाचा गोडरस. १४ अज्ञान लोक किंवा लहान मुलें यांस. १५ थोड्या अक्षरांत. १६ पुष्कळ अर्थ. १७ विस्तृत टीका स्पष्टीकरणानें. १८ गूढार्थ. १९ भ्याला असता, हें कथन विरोध भासात्मक आहे. † अमृतफलाच्या.

ह्मणता 'कुलवानितांसम आर्या माझ्या करूनियां उघड्या ॥
बहुमत्त रसिक झुंडी त्यांवरि आणील टाकवीत उड्या !' ॥ ८ ॥
चित्तांत धन्य होता निजकविताकन्यकांस विश्वाच्या-॥
विद्यालयांत शिक्षण द्याया यत्नेंच योग्यता त्याच्या ॥ ९ ॥
सहृदय वामन सुकवन-सुलभनिरूपणिं जनास आसक्त ॥
अपुले, मयूरकविचे वाचक निःसीम कारितसे भक्त ॥ १० ॥

समाप्त.

---

१ युनिव्हरसिटींत. २ वामन रावजींच्या.